रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १९ • अंक १९
www.ramprahar.com

• बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ • पाने २८ • किंमत ₹२

## 'विरोधकांकडून महाराष्ट्राची राजकीय संस्कृती रसातळाला'



**मुंबई :** विरोधकांना जनतेतून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी ते अत्यंत खालच्या स्तराचे राजकारण करीत आहेत. या प्रकारांमुळे विरोधकांनी महाराष्ट्राची उच्च राजकीय संस्कृती रसातळाला नेली आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसकडून करण्यात आलेल्या वादग्रस्त विधानाचा समाचार घेताना त्यांनी विरोधक प्रसिद्धीच्या हव्यासापोटी अतिशय खालच्या स्तरावर उतरले आहेत, अशी खरमरीत टीका केली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. "बदनाम हुए तो क्या हुआ, नाम तो हुआ" या मानसिकतेतून हे सर्व चालले असून महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेत इतकी घसरलेली पातळी यापूर्वी कधीही पाहायला मिळाली नव्हती, अशी उद्विग्नता त्यांनी व्यक्त केली.

### अंतरंग

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आज पनवेलमध्ये/३

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त लेख/१३,२१


पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी आढावा बैठक/२७








5 ऑगस्ट
तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे..!
लोकप्रिय आमदार
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा. श्री.
प्रशांतजी ठाकूर
साहेब,
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
श्री. महादेवशेठ रामचंद्र पाटील
अध्यक्ष : हनुमान मंदिर ट्रस्ट, खानावले; भाजप ज्येष्ठ नेते
शुभेच्छुक
सौ. सुनीता महादेवशेठ पाटील
मा. सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत खानावले
श्री. मंगेश लक्ष्मण लबडे
(अध्यक्ष, पोयंजे पं.स.भाजपा)
दीपक पाटील
चेतन पाटील
विकास पाटील

05 Aug.
महाराष्ट्र प्रदेश सचिव,
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
शरदचंद्र पवार
मा. श्री.
सुरदास गोवारी
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
शुभेच्छुक
फर्म
D. M. SHIP
REPAIRS PVT.LTD.
Ship repairs, mechancial, engineers, electrical, hydraulic & boiler engineers, automation, new & re-conditions spares supplier
DMSR, #5, Space Residency
Plot No.65, Sec-35, Kamothe,
Navi MUmbai-410209
Surdas.gowari@dmshiprepair.com
ह.भ.प. श्री. स्व. गणपत राघो गोवारी शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे
ह.भ.प. श्री. दामाजी गणपत गोवारी विद्यालय अँण्ड ज्युनियर कॉलेज, कामोठे
RADHAI INKSAP SCHOOL
SHREE GANESH BEACH RESORTS
Village Diveagar,
Tal. Shrivardhan, Dist. Raigad.
Head Office : Shop No.10, Pushp Sangam Bldg., Plot No. 35/36, Sector-12, Poo. Manas Complex, Kamothe, Navi Mumbai-410209.
technical@dmshiprepair.com
www.dmshiprepair.com




5 ऑगस्ट
कीर्ती तुमची चहूदिशांना, कर्तृत्वाने गाठले आकाश!
ध्यानी मनी एकच ध्यास पनवेलचा सर्वांगीण विकास!!
कार्यसम्राट
मा. श्री. आमदार
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
विजय पाटील (बी.ई, सिव्हील)
E Mail : vijaykpatil74@gmail.com
VP Infratech
CIVIL ENGINEERS & GOVT. CONTRACTORS
Shop No. 5, Ground Floor, Jestha Nagrik Sangha Sabhagruha, Old Thana Naka Road, Panvel - 410 206, Raigad.
Asphalt Plant Owners
VPI
VP Infratech




5 ऑगस्ट
बुलंद ध्यासाचा
निर्भिड वृत्तीचा दमदार नेता..
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. महेश बालदी
आमदार,
उरण विधानसभा

रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक १९
www.ramprahar.com
◆ बुधवार, ५ ऑगस्ट २०२६ ◆ पाने २८ ◆ किंमत ₹ २

# उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आज पनवेलमध्ये

## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भव्य मूट कोर्टचा उद्घाटन समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या भव्य मूट कोर्टचा उद्घाटन समारंभ बुधवारी (दि. ५) सायंकाळी ४ वाजता खांदा कॉलनी येथे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत.



या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. (पान ४ वर..)

# सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

## राज्य पातळीवर 'दीपावली', तर रायगड जिल्हा स्तरावर 'इंद्रधनू' प्रथम

### यंदापासून डिजिटल अंकालाही बक्षीस

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वाधिक रकमेचे पारितोषिक असलेल्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०२५च्या अर्थात




रौप्य महोत्सवी वर्षाचा निकाल मंगळवारी (दि. ४) मुंबई येथे जाहीर करण्यात आला.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात पत्रकार परिषदेतून निकाल जाहीर केला. यंदापासून डिजिटल दिवाळी अंकाचा पारितोषिकांमध्ये समावेश करून प्रथम क्रमांकास १५ हजार, द्वितीय १० हजार, तर तृतीय अंकाला पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांच्यासह पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते. (पान ४ वर..)


# पनवेलमध्ये शनिवारी महारोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना नामांकित कंपन्या व विविध उद्योगांमध्ये रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने महारोजगार मेळावा २०२६ आयोजित करण्यात आला आहे. हा रोजगार मेळावा शनिवारी (दि. ८) सकाळी ९ वाजता खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात होणार आहे.

या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून दहावी उत्तीर्ण, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर तसेच विविध कौशल्ये असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विविध नामांकित कंपन्या व उद्योग या मेळाव्यात सहभागी होणार असून उमेदवारांना थेट रोजगाराच्या संधी मिळण्याबरोबरच जॉब इंटरव्ह्यू, करिअरच्या संधी आणि उत्तम नेटवर्किंग करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. (पान ४ वर..)

# शिक्षणतज्ज्ञ डॉ.डी.वाय. पाटील यांचे निधन



**कोल्हापूर :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि बिहार, त्रिपुरा व प. बंगालचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डॉ.डी.वाय. पाटील यांचे मंगळवारी (दि.४) निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी बुधवारी (दि. ५) सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत त्यांच्या कोल्हापूर येथील निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे.






## संपादकीय

# ठाम संदेश आवश्यक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडिओ फेसबुकवरून काही काळासाठी हटवण्यात आल्याबद्दल 'मेटा'चे प्रमुख मार्क झकरबर्ग यांनी वैयक्तिक माफी मागावी अशी मागणी माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे यांनी केली आहे. देशाचे डिजिटल सार्वभौमत्व आणि कायद्याचे राज्य या तत्त्वांवर कोणतीही तडजोड होणार नाही हा संदेश या सोशल मीडिया व तंत्रज्ञान कंपन्यांना ठामपणे दिला गेलाच पाहिजे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील युवकांना उद्देशून केलेल्या आणि पेपरफुटीविरोधात कठोर कारवाईचे आश्वासन देणाऱ्या एका फेसबुक व्हिडिओ पोस्टवर काही काळ निर्बंध घालण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने मेटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना समन्स बजावले होते. या प्रकरणावरून मेटाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरल्यानंतर मेटाने माफी मागण्याची तयारी दर्शवली. परंतु या प्रकरणी मेटाचे प्रमुख मार्क झकरबर्ग यांनी वैयक्तिक माफी मागावी अशी मागणी माहिती तंत्रज्ञानविषयक संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष निशिकांत दुबे यांनी सोमवारी केली. या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी समितीच्या सदस्यांनी केली आहे. मेटाने स्वतः मान्य केले आहे की पंतप्रधानांचा संबंधित व्हिडिओ पाच तासांसाठी हटवण्यात आला होता. तो रात्री साडेबारा ते पहाटे पाच या काळात दिसत नव्हता. ही अत्यंत गंभीर बाब असून झकरबर्ग यांच्याकडून माफी यायलाच हवी असे निशिकांत दुबे यांनी म्हटले आहे. झकरबर्ग यांनी माफी मागितली नाही तर माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत त्यांना मिळणारे सेफ हार्बर संरक्षण काढून घेतले पाहिजे असेही दुबे यांनी म्हटले आहे. या तरतुदीनुसार सोशल मीडिया नेटवर्क्स आणि इंटरनेट सेवा पुरवठादारांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील तृतीय पक्षाच्या मजकुरासाठी जबाबदार धरले जात नाही. मात्र आज हेही लक्षात घेण्याची गरज आहे की सोशल मीडिया कंपन्या आता केवळ तंत्रज्ञान पुरविणाऱ्या संस्था राहिलेल्या नाहीत, तर त्या जनमत घडविणाऱ्या प्रभावी व्यासपीठांमध्ये परिवर्तित झाल्या आहेत. त्यामुळे अशा कंपन्यांकडून निष्पक्षता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा स्वाभाविक आहे. पंतप्रधान मोदी यांचा नीट पेपरफुटीसंदर्भातील फेसबुक व्हिडिओ काही तासांसाठी हटविण्यात आल्याच्या घटनेने हाच प्रश्न नव्याने अधोरेखित झाला आहे. मेटाने हा व्हिडिओ तांत्रिक चुकीमुळे हटविला गेल्याचे सांगत तो पुन्हा उपलब्ध करून दिला आणि खेदही व्यक्त केला. मात्र देशाच्या पंतप्रधानांचा अधिकृत संदेश जवळपास पाच तास अनुपलब्ध राहणे ही बाब केवळ सामान्य तांत्रिक त्रुटी म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. म्हणूनच निशिकांत दुबे यांनी मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झकरबर्ग यांनी स्वतः वैयक्तिक माफी मागावी अशी मागणी केली आहे. त्यांचे हे विधान भारताच्या कायद्यांचा आणि सार्वभौम संस्थांचा सन्मान राखण्याच्या भूमिकेतून पाहिले पाहिजे. 'सेफ हार्बर' ही तरतूद सोशल मीडिया कंपन्यांना वापरकर्त्यांनी पोस्ट केलेल्या सामग्रीबाबत मर्यादित कायदेशीर संरक्षण देते. मात्र त्यासाठी त्यांनी कायद्याकडून अपेक्षित दक्षता, नियमांचे पालन आणि उत्तरदायित्व राखणे आवश्यक असते. जर एखादी कंपनी वारंवार भारताच्या नियामक संस्थांच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष करत असेल तर या संरक्षणाचा पुनर्विचार होणे ही स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणावी लागेल. मेटासारख्या जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांसाठी भारत हा सर्वांत मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. त्यामुळे भारतातील कायदे आणि संसदीय संस्थांबाबत त्यांच्याकडून अधिक संवेदनशीलता अपेक्षित आहे. म्हणूनच मेटाने या प्रकरणात केवळ खेद व्यक्त करून न थांबता अशा चुका पुन्हा होणार नाहीत यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.**


# पनवेलच्या जनतेचा बंदा, आमदार प्रशांतदादा..!

एकदा जनसेवेचा ध्यास घेतल्यानंतर माणूस निःस्वार्थीपणे आणि प्रामाणिकपणे जनसेवा कशा प्रकारे करू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आमचे आमदार प्रशांतदादा ठाकूर हे होय..! आज त्यांचा वाढदिवस. यानिमित्ताने या जनसेवकाला लाख लाख शुभेच्छा!

घरात श्रीमंती नांदतेय, संसारात कशाचीही उणीव नाही. आपले वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कर्तृत्वाने आणि पुण्याईने घरात सर्वकाही आलबेल आहे. आदर-सत्कार, मान-सन्मान, प्रतिष्ठा आणि आदरातिथ्य हे सर्वकाही मिळत असूनही जीवनात शौकीनपणाचा आणि विलासी आयुष्य जगण्याचा विचार न करता समाजसुधारकांच्या आणि वडिलांच्या कर्तृत्वाचा आदर्श घेऊन, आपले आयुष्य फलदायी घडविण्याचा वसा घेऊन, समाजसेवेचा शुद्ध झरा होण्याचा विधायक विचार घेऊन लोकसेवेची कास धरणारा नेता म्हणून आज आमदार प्रशांतदादांची जनमानसात ओळख आहे.

आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला सुरुवात केल्यापासून आमदार प्रशांत ठाकूर यांनी अनेक सामाजिक संस्थांमध्ये महत्त्वाची आणि मानाची पदे भूषवून त्या त्या संस्था लौकिकास आणल्या. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक, रयत शिक्षण संस्थेच्या समन्वयक समितीचे सदस्य, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) सदस्य, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचे सदस्य तसेच भारत सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय नेहरु युवा केंद्राकडून दिला जाणारा सर्वोत्तम युवक पुरस्कार, साई रत्न फाऊंडेशनचा युवा गौरव पुरस्कार, योग प्रिय प्रकाशनाचा वासुदेव बळवंत फडके पुरस्कार
आदी पुरस्कारांनी गौरवित होऊन ते



सन्मानित राहिले.

राजकीय जीवनात सुरुवातीलाच मोठे पाऊल उचलत आमदार प्रशांत ठाकूर पहिल्यांदा पनवेल नगर परिषदेचे नगराध्यक्ष झाले. भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष आणि मावळ लोकसभा निवडणूक प्रमुखपदही त्यांनी भूषविले. आपल्या कामाच्या जोरावर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भरगच्च आघाडीने शानदार निवडून येऊन त्यांनी विजयाचा चौकार मारला.

पनवेलची कष्टकरी जनता, विविध क्षेत्रातील कामगार यांच्याकडे आवर्जून लक्ष देऊन त्यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर सतत पुढाकार घेत असतात आणि आपल्या हातोटीने ते यशस्वीही होतात. पनवेल क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना जीवनावश्यक गोष्टीच्या पुरवठ्याची मागणी, आदिवासी जनतेच्या स्थितीबाबत आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेकडून चौकशी अहवाल मागणी, सिडको परिसरात आरोग्य केंद्र स्थापन करण्याची मागणी, सिडको परिसरातील प्रलंबित विकासकामांच्या पूर्ततेची मागणी, पनवेल शहराच्या झोपडपट्टीवासीयांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची मागणी वगैरे मागण्यांवर ते ठाम राहिले. पनवेलमधील अनेक कंपनी-कारखाने यामधील कामगारांना पगारवाढ व त्यांचे न्यायिक हक्क मिळवून दिले. शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी न्यायिक लढे देऊन ते लढे यशस्वी केलेत हे आम्हाला अभिमानास्पद आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांशी सलोख्याने, आपुलकीने आणि प्रेमाने वागून एकनिष्ठता मिळविली आहे. त्यामुळे ते प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात घर करून बसले आहेत. त्यांनी केलेल्या लोकोपयोगी कामांचा आणि कार्याचा आढावा घेतल्यास भरपूर काही लिहिता येईल.

सरकार दरबारी जनतेचा आवाज आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विधायक कार्याने प्रभावित झाल्याने पनवेलमधील सर्वच समाजाचा त्यांना पाठिंबा मिळत राहिला आहे तसेच पनवेल मतदारसंघात असलेल्या सर्व भाषिक समाजाचे कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे त्यांच्याबरोबर असतात. प्रत्येक क्षणी त्यांच्या हाकेला ओ देत असतात. लोकप्रतिनिधी कसा असावा तर तो प्रशांतदादांसारखा असावा असे आम्ही इतरांना अभिमानाने सांगत असतो. त्यांना वाढदिवसानिमित्त पुनश्च शुभेच्छा!

**ॲड. प्रकाश बिनेदार**, सभागृहनेते, पनवेल महानगरपालिका

पान ३ वरुन

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आज पनवेलमध्ये

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य उभे केले असून उच्च शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थेचा सातत्याने भर राहिला आहे. संस्थेने १९९२मध्ये आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात केली असून आज विविध शैक्षणिक शाखांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ हे संस्थेच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल असून कायद्याच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, त्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडावी आणि भविष्यातील कायदेपेशासाठी त्यांची सक्षम तयारी व्हावी या उद्देशाने मूट कोर्टसारख्या आधुनिक सुविधेला महत्त्व आहे.

भागुबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजची स्थापना शैक्षणिक वर्ष २००९-१०मध्ये करण्यात आली. हे कॉलेज मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेखाली कार्यरत आहे. हितचिंतक नागरिक, पालकांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे आणि संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य परेश ठाकूर यांनी केले आहे.

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

राज्यस्तरीय स्पर्धेत 'दीपावली' या दिवाळी अंकाने प्रथम क्रमांक पटकावत एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले आहे. या अंकाचे संपादक अशोक कोठावळे आहेत. विवेक कोरडे संपादित 'मुक्त संवाद' अंकाने द्वितीय (५० हजार रुपये), तर सई पवार संपादित 'वसा' आणि शर्मिष्ठा भोसले संपादित 'अक्षरलिपी' या अंकांना तृतीय क्रमांक (प्रत्येकी ३० हजार रुपये) विभागून देण्यात आला आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत विविध साहित्यिक आणि कलात्मक विभागांमध्येही उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंकांचा आणि लेखकांचा गौरव करण्यात आला आहे. 'बाईमाणूस' या अंकाला लक्षवेधी उत्कृष्ट अंकाचा पुरस्कार (१५ हजार रुपये) मिळाला असून त्याचे संपादक प्रशांत पवार आहेत. 'धनंजय' अंकातील 'आवाज' या कथेसाठी लेखिका मनस्विनी लता रवींद्र यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार (सात हजार रुपये), तर 'ललित' अंकातील 'टॉलस्टॉयची सायकल' या लेखासाठी लेखक डॉ. नंदू मुलमुळे यांना उत्कृष्ट लेखाचा पुरस्कार (पाच हजार रुपये) जाहीर झाला आहे. 'युगांतर' अंकातील 'त्याने तिरंगा पाहिला' या कवितेसाठी कवी सतीश लोले यांना उत्कृष्ट कविता पुरस्काराने (पाच हजार रुपये) गौरविण्यात येणार आहे.

'नवभारत' या अंकाला उत्कृष्ट विशेषांक पुरस्कार (१५ हजार रुपये) जाहीर झाला असून त्याचे संपादक निरंजन हातेकर आहेत. बालसाहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी जयंत मोडक संपादित 'मुलांचे मासिक' या अंकाला उत्कृष्ट बाल दिवाळी अंकाचा पुरस्कार (सात हजार ५०० रुपये) देण्यात येणार आहे. याशिवाय 'अक्षर' अंकातील 'युद्धकांड' या परिसंवादासाठी मीना कर्णिक आणि हेमंत कर्णिक यांना लक्षवेधी परिसंवाद पुरस्कार (पाच हजार रुपये), तर 'शब्दांगण' अंकातील आसाराम लोमटे यांच्या मुलाखतीसाठी मुलाखतकार मनिषा उगले यांना लक्षवेधी मुलाखत पुरस्कार (पाच हजार रुपये) जाहीर करण्यात आला आहे. 'साप्ताहिक विवेक' या अंकाच्या मुखपृष्ठासाठी चित्रकार विनायक खरात यांना सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ पुरस्कार (पाच हजार रुपये), तर सर्वोत्कृष्ट व्यंगचित्र पुरस्कार ज्ञानेश बेलेकर यांना (पाच हजार रुपये) देण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतही विविध अंकांनी आपला ठसा उमटविला. यात 'इंद्रधनू' या दिवाळी अंकाने प्रथम क्रमांक पटकावत ४० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले आहे. या अंकाचे संपादक विजय पवार आहेत. दीपक म्हात्रे संपादित 'आगरी दर्पण' अंकाने द्वितीय क्रमांक (२० हजार रुपये) प्राप्त केला आहे, तर विनोद साळवी संपादित 'शब्दसंवाद' या अंकाने तृतीय क्रमांक (१० हजार रुपये) मिळविला आहे. अनिल भोळे संपादित 'रसायनी टाइम्स' आणि गणेश कोळी संपादित 'पनवेल टाइम्स' या अंकांना उत्तेजनार्थ पुरस्कार (प्रत्येकी पाच हजार) देण्यात येणार आहे.

रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत विविध साहित्य प्रकारांमध्ये उत्कृष्ट लेखन करणाऱ्या साहित्यिकांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. 'आगरी दर्पण' अंकातील 'गॉटर' या कथेसाठी लेखक किरण शेले यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार (तीन हजार रुपये) जाहीर करण्यात आला आहे. 'श्री समर्थ विचार' अंकातील 'ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची दुर्दशा' या लेखासाठी लेखक अरविंद पाशिलकर यांना उत्कृष्ट लेख पुरस्कार (तीन हजार रुपये), तर 'म्हसळा टाइम्स' अंकातील 'चाळ' या कवितेसाठी कवी दिलीपराव झुंजारराव यांना उत्कृष्ट कविता पुरस्कार (तीन हजार रुपये) देण्यात येणार आहे.

राज्यभरातून प्राप्त झालेल्या विविध दिवाळी अंकांचे परीक्षण साहित्यिक गुणवत्ता, आशय, विषयाची निवड, मांडणी, पत्रकारितेचा दर्जा, सामाजिक भान, कलात्मकता, सर्जनशीलता आणि वाचनीयता या विविध निकषांच्या आधारे करण्यात आले. त्यातून विविध विभागांतील विजेत्यांची निवड करण्यात आली. राज्यभरातून उदंड प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेसाठी विणा सानेकर, रेखा देशपांडे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक, तर समन्वयक म्हणून दीपक म्हात्रे व शैलेंद्र शिर्के यांनी जबाबदारी बजावली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, मराठी संस्कृतीमध्ये दिवाळी अंकांना मोठी आणि समृद्ध परंपरा आहे. साहित्य, पत्रकारिता, कला, सामाजिक प्रश्न, संस्कृती, इतिहास, व्यक्तिचित्रण, कथा, कविता, वैचारिक लेखन आणि विविध विषयांना दिवाळी अंकांच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळते. बदलत्या काळातही ही परंपरा अधिक समृद्ध व्हावी आणि नव्या पिढीतील लेखक, पत्रकार, साहित्यिक व कलावंतांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या दिवाळी अंकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवून मराठी साहित्य आणि पत्रकारितेची समृद्ध परंपरा जपण्याचे काम केले. दिवाळी अंकांच्या माध्यमातून दर्जेदार साहित्याला चालना मिळावी, समाजातील विविध प्रश्नांवर वैचारिक चर्चा व्हावी, नवोदित लेखकांना संधी मिळावी आणि मराठी भाषा-साहित्याची परंपरा अधिक व्यापक व्हावी यासाठी या स्पर्धेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरत आहे, असे सांगून राज्यस्तरीय तसेच रायगड जिल्हास्तरीय विजेत्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अधिकाधिक दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित व्हावेत, अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केली तसेच लवकरच पारितोषिक वितरण सोहळा मुंबईत होणार असल्याचे सांगितले.

**सातत्याने २५ वर्षे दिवाळी अंक स्पर्धेचा उपक्रम राबविला जात आहे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. या उपक्रमासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. दिवाळी अंकांसाठी एवढ्या मोठ्या रकमेची पारितोषिके देणारी अशी स्पर्धा देशात अन्यत्र कुठेही होत नाही.**

**-संदीप चव्हाण**, अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघ

## पनवेलमध्ये शनिवारी महारोजगार मेळावा

'रोजगार शोधणाऱ्यांना सुवर्णसंधी' या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधींच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मेळाव्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून जाहिरातीतील क्यूआर कोड स्कॅन करून किंवा दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून उमेदवार नोंदणी करू शकतात. अधिक माहितीसाठी ७४९८०७४१०५ या क्रमांकावर संपर्क साधावा. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारोजगार मेळाव्यात सहभागी होऊन युवकांनी आपल्या भविष्याची दिशा निश्चित करावी आणि उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवशी सेवाभावाचा उत्सव

## कळंबोलीत ५२ वृक्षांच्या संगोपनाचा संकल्प



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा वर्षाव, पुष्पगुच्छ, बॅनरबाजी आणि जाहिरातींची रेलचेल अशी रूढ झालेली परंपरा बदलण्याचा प्रयत्न कळंबोलीत पाहायला मिळाला. समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाला प्राधान्य देत लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५२व्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून तो निधी समाजोपयोगी, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी खर्च करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक ठिकाणी विधायक उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. ४) शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने नवीन सुधागड हायस्कूल येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमातून शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची मदत करण्यात आली.

यावेळी शाळेच्या परिसरातून वृक्षदिंडी काढण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक आणि पदाधिकाऱ्यांनी 'झाडे लावा... झाडे जगवा', 'पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. वृक्षदिंडीद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आला. हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि घटणारे हरित क्षेत्र या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले. यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५२व्या वाढदिवसानिमित्त ५२ सावली देणाऱ्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक आणि नगरसेविका सायली सरक यांनी केला. केवळ वृक्षारोपण करून थांबायचे नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करून ते मोठे करण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावतानाच पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहेत. आजच्या पिढीत शिक्षणाबरोबरच पर्यावरणाबद्दलची जबाबदारी रुजविणे काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमधून समाजात सकारात्मक परिवर्तन घडते. या उपक्रमासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेविका सायली सरक तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नगरसेवक रामदास शेवाळे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक राजेंद्र शर्मा, नगरसेविका सरस्वती काथारा, बायजा बारगजे, वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, भाजपचे स्थानिक नेते अशोक मोटे, सुधागड हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र पालवे, पुण्यवंत खटकाळे, डी.एन. मिश्रा, आबा लकडे, शंकर वीरकर, श्रीकांत फाळके, महेश गोडसे, निलेश दिसले, प्रेम डांगे, विभागप्रमुख संजय शेडगे, राज जाधव, प्रेम गोडसे, विराट पवार, सुभाष घाडगे, सुधीर ठोंबरे, कुमार नलावडे यांच्यासह आयोजक तुकाराम सरक, नगरसेविका सायली सरक, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

# बीसीटी विधी महाविद्यालयात पार्लियामेंटम २०२६

## दोन दिवसीय युवा संसद स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय खांदा कॉलनी येथे वादविवाद मंडळाच्या वतीने आयोजित "पार्लियामेंटम युवा संसद स्पर्धा २०२६" या दोन दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ झाला. या प्रतिष्ठित स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधील १६ संघांनी सहभाग नोंदविला असून ९० विधी विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धतीवर आधारित काल्पनिक संसदेत सहभाग घेतला.



स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य अर्चना ठाकूर, ॲड. राहुल घरत, बीसीटी विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख, तसेच बीएएलएलबी अभ्यासक्रम समन्वयक धनश्री चौगुले यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांचे जतन करत जबाबदार नागरिक आणि सक्षम नेतृत्व म्हणून देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात डॉ. सानवी देशमुख यांनी युवा संसद स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित करताना अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कायदेविषयक ज्ञानात, वक्तृत्वकलेत, नेतृत्वगुणांत आणि संसदीय कार्यपद्धतीच्या आकलनात वाढ होत असल्याचे सांगितले.

उद्घाटनानंतर पहिली प्राथमिक फेरी सकाळच्या सत्रात, तर दुसरी प्राथमिक फेरी दुपारच्या सत्रात पार पडली. दोन्ही सत्रांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संशोधन, प्रभावी मांडणी, संघभावना आणि संसदीय नियमांचे पालन करत उल्लेखनीय कामगिरी केली.

यंदाच्या स्पर्धेचा विषय "द प्रोटेक्शन ऑफ मायनर्स (सोशल मीडिया रेग्युलेशन) बिल २०२६" हा होता. या विषयावर विद्यार्थ्यांनी डिजिटल युगातील अल्पवयीनांच्या संरक्षणासाठी आवश्यक कायदेशीर उपाययोजना, सामाजिक माध्यमांचा जबाबदारीने वापर आणि समकालीन सामाजिक व कायदेशीर प्रश्नांवर सखोल चर्चा करत प्रभावी मते मांडली.

स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्यांचे परीक्षण विधी क्षेत्रातील मान्यवरांनी केले. ॲड. दीपाली बोहरा यांनी पहिल्या सत्राचे, तर ॲड. भक्ती एस. दळवी यांनी दुसऱ्या सत्राचे परीक्षण केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे, तर्कशुद्ध मांडणीचे, कायदेविषयक सखोल अभ्यासाचे आणि संसदीय शिस्तीचे विशेष कौतुक केले.

स्पर्धेचा दुसरा दिवस ५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला असून प्राथमिक फेरीत पात्र ठरलेले संघ उपांत्य व अंतिम फेरीत आपले संसदीय कौशल्य सादर करतील. त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभाने या प्रतिष्ठित राज्यस्तरीय युवा संसद स्पर्धेची सांगता होईल. विजेत्या संघाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व अन्य मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे.

# ११ भाजप कार्यकर्त्यांवर निलंबनाची कारवाई

## पक्षविरोधी काम केल्याचा ठपका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षविरोधी काम केल्याचा ठपका ठेवत भारतीय जनता पक्षाचे सदस्य सुदेश फडके, सचिन दुर्गे, करण फडके, रामदास फडके, काळुराम फडके, आकाश फडके, महेंद्र म्हात्रे, सागर भोईर, गौरव भोईर, दिनेश काठवले आणि संतोष दुर्गे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

पक्षाच्या धोरणांविरोधात कृती केल्यामुळे त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिकृत पत्र भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी जारी केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून सक्रिय काम करणे अपेक्षित होते, मात्र त्यांनी निवडणुकीदरम्यान भाजपच्या अधिकृत उमेदवारांचे काम न करता विरोधी पक्षाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केल्याचे निदर्शनास आले.

या पक्षविरोधी कारवायांची गंभीर दखल घेत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर शिस्तभंगाची कारवाई करीत त्यांना सहा वर्षांकरिता भारतीय जनता पार्टीतून निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.




**पनवेल : येथील महापालिकेचे नगरसेवक समीर ठाकूर यांनी मंगळवारी आपल्या वाढदिवसनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नगरसेवक समीर ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**


## जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP २९/२०२६**

**आलिया शहाबुद्दीन आणि इतर ३** — **अर्जदार**

**विरूद्ध**

**गणपत रामचंद्र निकम** — **विरूद्ध पक्षकार**

**आणि**

**टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**गणपत रामचंद्र निकम**
**पत्ता-** ३०३ मेट्रो व्ह्यू, तळोदे पंचनद, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०८, मुंबई, महाराष्ट्र
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **१०-०८-२०२६** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **अध्यक्ष श्रीमती मोनिका इनोक आर्लेंड** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस दिनांक **०७-०७-२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
अध्यक्ष
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१




**पनवेल : अथक परिश्रम, एकाग्रता आणि वेगाच्या जोरावर पेठपाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमधील सिद्धार्थ संतोष दास याने 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला. दोरीवरच्या उड्या मारण्यात सिद्धार्थने एक-दोन नव्हे, तर तब्बल पाच अधिकृत जागतिक विक्रम आपल्या नावे नोंदवण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिद्धार्थ दासचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-: बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७३/२ | ०-१३-१०<br>पो.ख. ०-०-०<br>एकूण ०-१३-१० | ०.९१ | **गुणा भगवान गावडे<br>जयश्री जनार्दन पाटील<br>प्रकाश बळीराम पाटील<br>राधाबाई बळीराम पाटील<br>हरिश्चंद्र बळीराम पाटील<br>सुरज सुभाष पाटील<br>रसिका सुभाष पाटील** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०४/०८/२०२६.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१



## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्रीमती. संजीवनी श्रीनिवास पैठणकर , पत्ता : रा. फ्लॅट नं ००२ पुष्पमाळा बिल्डिंग, से ४ प्लॉट नं ८०/८१ नवीन पनवेल - ता.पनवेल जि. रायगड ४१०२०६ खालील प्रकारची कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. EgOwDLgMfN दिनांक. ०१/०८/२०२६ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. प्लॉट नं बी १३३ कोकण फलोद्यान कृषी उत्पन्न सोसायटी- कर्जत शेअर्स सर्टिफिकेट

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९०२२५३०६४४ वर संपर्क साधावा.

**दिनांक :- ०४/०८/२०२६**

**सही/-**
**संजीवनी श्रीनिवास पैठणकर**

पत्ता :- रा. प्लॅट नं ००२ पुष्पमाळा बिल्डिंग से ४ फ्लॅट नं ८०/८१ नवीन पनवेल - पनवेल जि. रायगड ४१०२०६


# मुंब्रादेवी रबाळे डोंगर परिसरात भव्य वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरण संवर्धनाचा वसा जोपासत आणि निसर्गाप्रती आपली कटिबद्धता कायम ठेवत, ऐरोली विधानसभेचे प्रथम आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवार दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी मुंब्रा देवी, रबाळे डोंगर परिसरात एका भव्य वृक्ष लागवड मोहिमेचे आयोजन करण्यात आले. मातोश्री अनुसया सोनवणे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आणि माजी महापौर सुधाकर सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेली ही मोहीम उपस्थितांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली.



माजी आमदार नाईक यांनी आपल्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीत कायमच 'ग्रीन होप' संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. केवळ घोषणा न करता कृतीतून नवी मुंबईत हजारो वृक्षांची लागवड व जोपासना त्यांनी केली आहे. त्यांच्या याच पर्यावरणपूरक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना नवी मुंबईच्या हरित सौंदर्यामध्ये भर घालणारी आणि कायमस्वरूपी स्मरणात राहील अशी 'हरित भेट' देण्याचा संकल्प माजी महापौर सोनवणे यांनी केला. या दिमाखदार आणि महत्त्वपूर्ण कार्यक्रमात अनेक दिग्गज मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती. मातोश्री अनुसया सोनवणे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नगरसेविका रंजना सोनवणे, डॉ. गौतमी सोनवणे, आणि राहुल सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. निसर्ग संवर्धनाच्या या पवित्र मोहिमेला प्रशासकीय आणि पोलिस दलाचीही भक्कम साथ लाभली.


*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी*
राम प्रहर



## जाहिर नोटीस

वरील विषयानुसार आपणांस कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत बारवई अंतर्गत ग्रामपंचायत मार्फत ग्रामनिधी अंतर्गत ग्रामपंचायत बारवई हद्दीतील भटके कुत्रे पकडून त्यांचे लसीकरण आणि निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांचेकडे प्राणी प्रजनन प्रतिबंध कार्यक्रम करीता नोंदधिकृत असलेल्या संस्था यांचेकडून मान्यता प्राप्त संस्था / NGO निविदा प्राप्त होणेकामी कामाची निविदा जाहिरात आपल्या वत्त पत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

| अ. क्र | कामाचे नाव | तरतूद रक्कम निर्बिजीकरण करणे व उपचार केंद्रात ठेवण्याचा दर (प्रति श्वान) | योजना | सन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत बारवई हद्दीतील भटके कुत्रे पकडून त्यांचे लसीकरण आणि निर्बिजीकरण करणे उपचार केंद्रात ठेऊन देखभाल करणे आणि सोडणे | १९५० | ग्रामनिधी | २०२६/२७ | निविदा स्वीकारणे नाकारणे,मंजूरीचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे |

**अटी व शर्ती -**

१) स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी कल्याण मंडळ यांचेकडे प्राणी प्रजनन प्रतिबंध संस्था नोंदधिकृत असणे आवश्यक आहे.
२) समितीची मान्यता मिळाल्यानंतर कार्यरंभ आदेश देण्यात येईल.
३) समितीच्या अहवाल पडताळणी केल्यानंतर मंजुरी दिल्यास त्याप्रमाणे देयके अदा करण्यात येईल.
४) कुत्र्यावर केलेल्या रेबीज प्रक्रियेमधून निघालेले अनुषेश यांची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.
५) कुत्र्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यांच्या शारीरीक स्वास्थाची काळजी घेवून पुर्ण बरे झाल्यानंतरच त्याच ठिकाणी सोडण्यात यावे.
६) ज्याठिकाणाहून प्रक्रिया करीता कुत्रा पकडण्यात येईल त्याचठिकाणी प्रक्रिया झाल्यानंतर कुत्रा सोडण्यात यावा.
७) कुत्रा पकडण्याच्या प्रक्रीयेमध्ये स्थानिक नागरीकांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेणे.

**सही/-**
**श्रीम. सविता चंद्रकांत राठोड**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत बारवई**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**ॲड.सौ. नियती निलेश बाबरे**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत बारवई**
**ता. पनवेल, जि. रायगड**



## पनवेल महानगरपालिका
### परवाना विभाग
### जाहिर सूचना

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील MSRDC च्या ROW मध्ये येणाऱ्या सर्व जाहिरात होर्डिंगधारक यांना कळविणेत येते की, सदरच्या जाहिरात फलकाची परवानगी दि. ०६/०९/२०२४ रोजीने रद्द करणेत आलेला आहे. तसेच आपणांमार्फत उभारणेत आलेले जाहिरात फलक निष्कासित करणेबाबत याआधी कळविणेत आलेले आहे. परंतु आपण अद्यापपर्यंत सदरचे जाहिरात फलक निष्कासित करणेत आलेले नाही. तरी आपणांमार्फत MSRDC च्या ROW मध्ये उभारणेत आलेले जाहिरात होर्डिंग तात्काळ निष्कासित करणेत यावे.**

**तसेच सदर जाहिरात होर्डिंगचे थकित जाहिरात परवाना शुल्क तात्काळ या कार्यालयाकडे भरणा करणेत यावे. व सदर जाहिरात होर्डिंग आपणांकडुन निष्कासित करणेत यावे. सदरची कार्यवाही हे पत्र मिळताच ०७ दिवसांत करणेत यावी. अन्यथा महापालिकेकडुन सदरची जाहिरात होर्डिंग निष्कासित करणेत येऊन, होणारा खर्च, जाहिरात शुल्क व दंडाची रक्कम आपणांकडुन वसुल करुन, नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.२४२/२५५/२०२६
दिनांक : ०४/०८/२०२६

सही/-
(महेशकुमार मेघमाळे)
अतिरिक्त आयुक्त-II
पनवेल महानगरपालिका



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मोजे शहापूर, ता. अलिबाग सर्वे नं. ४२७/३ एकूण क्षेत्र ०.४३.०० हे.आर. चौ.मी. आकार ५.३१ पैसे ही मिळकत या मिळकतीचे विदयमान कब्जेदार श्री. श्रीकांत शिवाजी मोतलिंग यांच्याकडून त्यांच्या नांवे असलेली वरील मिळकतीचा संपूर्ण हिस्सा कायमस्वरुपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, ताबेकब्जा, वहिवाट, मृत्यूपत्रांकित दान, साठेकरार, वारसाहक्क, दावा, जप्ती, बोजा, जाणे येण्याचा मार्ग, पोटगी वगैरे नाही. मात्र सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांच्या पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आमचे अशिल यांचे वकील यांच्या खालील दिलेल्या फोन नंबर वर अथवा लेखी कळवावी. सदर मुदतीमध्ये कोणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास वरील वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बिनजोखमीची आहे असे समजून आमचे अशिल या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणा-या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: उरण**
**दिनांक ०४/८/२०२६**


**सही/-**
**ॲड. निखिल भोईर**
**ऑफिस- मु. विंधणे**
**पो. दिघोडे, ता. उरण**
**मो. नं. ८२८६२०२२७२**


बुलंद ध्यासाचा
निर्भीड वृत्तीचा
दमदार नेता..
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
कार्यसम्राट आमदार
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
प्रशांतदादा
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
सुधीर घरत
कामगार नेते,
राष्ट्रीय कोषाध्यक्ष, भारतीय पोर्ट अँड
डॉक मजदूर महासंघ – (बी.एम.एस.)


5 ऑगस्ट
सर्वसामान्य जनतेचे प्रश्न
सोडवण्यासाठी सदैव तत्पर
असणारे लोकप्रतिनिधी...
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
दमदार
मा.श्री. आमदार
प्रशांतदादा
ठाकूर आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
मा. श्री. हॅप्पी सिंग
राज्य सदस्य - अल्पसंख्याक आयोग
महाराष्ट्र राज्य
नगरसेवक - पनवेल
महानगरपालिका



5 ऑगस्ट
कीर्ती तुमची
चहूदिशांना,
कर्तृत्वाने गाठलं
आकाश!
ध्यानी मनी एकच ध्यास
पनवेलचा
सर्वांगीण विकास!!
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
विशाल ठाकूर
राकेश म्हात्रे
राहूल म्हात्रे
शुभेच्छुक
श्री स्वामी समर्थ फ्युएल स्टेशन
इंडियन ऑईलचे अधिकृत विक्रेते
इंडियनऑयल
IndianOil
मुंबई गोवा हायवे, NH-66, हॉटेल स्वामी कृपा शेजारी, मु. पो. जिते, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
E mail - shreeswamisamarth0205@gmail.com


श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष
कार्यसम्राट आमदार
मा.श्री. प्रशांतदादा
ठाकूर आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. दिलीप बाळाराम पाटील, अध्यक्ष
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
प्रभाग क्रमांक १२, कामोठे
श्री. मंदार पनवेलकर
(प्रशासकीय अधिकारी)
कै. बाळाराम धर्मा पाटील शिक्षण संस्थेचे
सुषमा पाटील विद्यालय, ज्युनिअर कॉलेज
व सिनिअर नाईट कॉलेज कामोठे
(मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यम)
पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग
(प्लॉट नं. ३९, सेक्टर ११, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.)
पदवीधर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा!
९६६४०४०८२४ / ८४२५८८८११४
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यास केंद्र, कामोठे
एस. एन. डी. टी. महिला मुक्त विद्यापीठ, मुंबई अभ्यास केंद्र, कामोठे
B.A./ B.Com. / M.A. / M.Com.


05 Aug.
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
विक्रम
यशवंत साबळे
उपनगराध्यक्ष,
खोपोली नगरपरिषद,
भारतीय जनता पार्टी


सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी
ठेऊन कार्यरत असणारे
कार्यसम्राट
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा !
रवींद्र नाईक
विनायक मुंबईकर
पांडुरंग पाटील
जितेंद्र घरत
(कामगार नेते)
शेखर तांडेल
चंद्रकांत कडू
ज्ञानेश्वर साखरे
शुभेच्छुक
जय भारतीय जनरल कामगार संघटना
वंदे मातरम जनरल कामगार संघटना


5 ऑगस्ट
बुलंद ध्यासाचा
निर्भीड वृत्तीचा
दमदार नेता..
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
लोकप्रिय
मा.श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
दादा आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
सौ.रंजना सदाशिव वास्कर
सभापती पंचायत समिती पनवेल
श्री.सदाशिव रामदास वास्कर
मा.सरपंच कुंडेवहाळ


दमदार
आमदार
5 ऑगस्ट
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
साहेब आपणांस
अनंत शुभेच्छा !
वाढदिवसाच्या
शुभेच्छुक
ॲड.प्रकाश बिनेदार
सभागृह नेता-पनवेल महापालिका,
भाजप-पक्ष प्रवक्ता व
सरचिटणीस रायगड जिल्हा


hiranandani communities
a niranjan hiranandani initiative
MahaRERA No.:
STADIA: PR1270002502090
https://maharera.mahaonline.gov.in
STADIA
LAST OPPORTUNITY TO OWN
3 BHK
SPORTS-THEMED LUXE HOMES
PRE-LAUNCHING NEW TOWER
PRE-BOOK WITH
EOI @ ₹3LAKH ONLY
AT
HIRANANDANI
FORTUNE CITY
PANVEL
Image Used for Representational Purpose Only
TOWNSHIP AMENITIES
HIRANANDANI TRUST SCHOOL | MEDICAL CENTER | LANDSCAPED GARDEN | PEDESTRIAN FRIENDLY TREE-LINED AVENUES |
SUPERMARKET | RETAIL OUTLETS | RESTAURANTS | SHUTTLE BUS SERVICE
022 48964999
The project has been registered via MahaRERA registration number: Stadia: PR1270002502090, and is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). *T&C Apply.


5 ऑगस्ट
बुलंद ध्यासाचा
निर्भीड वृत्तीचा
दमदार नेता..
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत
ठाकूर
दादा आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. एकनाथ चांगो देशेकर
(मा. सदस्य, रा.जि.प.)
रायगड जिल्हा अध्यक्ष, रा.जि.प. ओबीसी सेल
सौ. कमळा
एकनाथ देशेकर
अध्यक्ष, पनवेल तालुका
भाजपा महिला मोर्चा
मा. सरपंच, चिंध्रण ग्रामपंचायत


श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक
विकास मंडळाचे अध्यक्ष
कर्तव्यदक्ष
आमदार
मा. श्री.
प्रशांत
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
प्रोप्रायटर : श्री. भार्गव रामदास ठाकूर
कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफिस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६


संकल्प असावेत नवे तुमचे मिळाव्यात त्यांना नव्या दिशा..
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे ह्याच वाढदिवसाच्या शुभेच्छा!
दमदार
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
SHREE CONSTRUCTION
OUR SERVICES
STONE CRUSHER OWNER
RMC PLANT OWNER
EARTHWORK CONTRACTOR
BUILDERS & DEVELOPERS
ROAD WORK ONTRACTOR
CIVIL WORK CONTRACTOR
INDUSTRIAL OIL SUPPLIER
BUILDING MATERIAL SUPPLIER
BASEMENT EXCAVATION CONTRACTOR
PRODUCTION SITE:
GAVHAN PLANT:
Survey No.356/9, Gavhan Village,
Jasai Uran, Raigad, Maharashtra
KUNDEVAHAL PLANT:
Survey No. 61, Kundevahal
Village, Raigad, Maharashtra
PROPRIETOR: SHRI. MANOJ M. ANGRE (9322121312)



सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर असणारे लोकप्रतिनिधी
5 ऑगस्ट
कार्यसम्राट आमदार मा.श्री. प्रशांत ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
मच्छिंद्र सुदाम जाधव | आणि सुखम् परिवार
मो. नं. ९९८७७२११८८
M. S. LOGISTICS
Fleet Owners & Transport Contractors
We Supply all Type of Container Vehicles and Tempo
सुखम् हॉस्पिटल
आणि आय. सी. यु. | सुखम् आयुर्वेदा
। डॉ. संतोष सुदाम जाधव
। डॉ. दिपाली संतोष जाधव । डॉ. प्राजक्ता मच्छिंद्र जाधव
9004657988 | 7400187988 | 9870028585
Panvel : Jasdanwala Complex, Visharali Naka, Old Panvel, Raigad - 410 206.
Tel.: 022-2748 2054. Email : sukhamhospital@yahoo.com
Karanjade : Beind Ganesh Temple, Ganesh Nagar, Karanjade. Ta-Panvel,
Dist. Raigad. Tel. : 9136049988. Email : sukhamhospital@gmail.com




बुलंद ध्यासाचा निर्भिड वृत्तीचा दमदार नेता..
5 ऑगस्ट
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर दादा
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. मदन तुकाराम कोळी
मा. उपनगराध्यक्ष, प.न.पा.




पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
दमदार आमदार मा.श्री. प्रशांत ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
CHAIRMAN H. G. PATIL
MANOJ PATIL
CHANDAN PATIL
MANOJ InfraWork Pvt. Ltd.
MANOJ ENTERPRISES
Civil Contractor & Concrete Plant Owner
Off :- 21/22, Second floor, Near Sukham Hospital, Jasdhanwala Office Complex,
Panvel. 9870022236/02227468650. Email : manojent.2000@gmail.com





5 ऑगस्ट
सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर असणारे
लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर साहेब आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स कर्मचारी सहकारी पतसंस्था, मर्यादित (पनवेल)
अरुण जनार्दन नाईक (सहकार तज्ज्ञ संचालक)
शशिकांत मुंबईकर (माजी सचिव)
जगदिश हरिश्चंद्र घरत (अध्यक्ष)
संदीप सत्यवान आंग्रे (सचिव)
विवेक चिंतामण कोळी (खजिनदार)
संतोष तुकाराम कडू (उपाध्यक्ष)
आनंदकुमार लाल (संचालक)
शिरीष सुधाकर थवई (सहखजिनदार)
भुपेश हरि कडू (संचालक)
धुवनाथ नामदेव कोळी (संचालक)
तुकाराम श्रावण वाघे (संचालक)
मनिषा खेमचंद जैन (सहसचिव)
रजनी सुनील पाटील (संचालिका)
रवींद्र नामदेव म्हात्रे (कार्यलक्षी संचालक)



5 ऑगस्ट
अगणित माणसे या जगात जन्मास येतात, पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
लोकप्रिय
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन
प्रोप्रा. मंगेश पिलविळकर


05 Aug.
सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर
कार्यसम्राट
आमदार
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ
नगरसेवक : पनवेल महानगर पालिका
मा. सभापती : सार्वजनिक बांधकाम, विकास व नियोजन समिती
मा. अध्यक्ष : पनवेल वकील संघटना
प्रदेश निमंत्रित सदस्य : भारतीय जनता पार्टी
संयोजक महाराष्ट्र : ओ.बी.सी. मोर्चा (Head Quarter Delhi) रीसर्च अँड पॉलिसी
उपाध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश भाजप ओ.बी.सी मोर्चा
उपाध्यक्ष (संघटन) : अ.भा. अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा



05 Aug.
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
दमदार
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
कृष्णा पाटील
मा. सरपंच
भाजपा अध्यक्ष, प्रभाग क्र. २ पनवेल महानगरपालिका
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
शुभेच्छुक
श्री. कृष्णशेठ पाटील सामजिक विकास मंडळ, पडघे
मु. पो. पडघे, ता. पनवेल, जि. रायगड
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)


कीर्ती तुमची चहूदिशांना, कर्तृत्वाने गाठलं आकाश! ध्यानी मनी एकच ध्यास पनवेलचा सर्वांगीण विकास!!
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
अनिल भगत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका


चिटणीस भाजपा महाराष्ट्र
दमदार
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
05 Aug.
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
के. अे. म्हात्रे
उपाध्यक्ष, पनवेल तालुका भाजपा
M/S. RAJ CONTRACTOR & ENGINEERS
Builders & Suppliers
At Dapoli, Post. Pargaon, Tal. Panvel, Pargaon, Tal. Panvel, Dist. Raigad


कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
निलेश दमडे
मे. विधिती इंटरप्रायजेस
(ओवळे)


05 Aug.
लोकप्रिय
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
CCB
Mr. Chandrakant Bhoir
+91 98332 33315
Mr. Vishal Bhoir
+91 87793 96970
M/s. CHANDRAKANT C. Bhoir
Government Registered Contractors, Earth Movers, Transport & Civil Contractors
At & Post - Nhava, Tal. Panvel, Dist. Raigad, Navi Mumbai - 410 206.vishalbhoir11@gmail.com


तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे..!
कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
हरिश्चंद्र म्हात्रे
माजी सरपंच,
न्हावे ग्रामपंचायत (ता. पनवेल)


DS द्वारकादास शामकुमार
महाराष्ट्राचे महावस्त्रदालन, लग्न बस्त्याचे माहेरघर...
मा.श्री.
आमदार
प्रशांत ठाकूर साहेब आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
द्वारकादास शामकुमार
शॉप नं. ४, आनंद नगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल ४१० २०६.
संपर्क : ९०४९७७७५४४, ८१०४२०७७९३
श्री. शरद पाटील (संचालक, द्वारकादास शामकुमार-पनवेल)




















SimuSoft





# उत्तुंग व्यक्तिमत्त्व

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सत्कार तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या नवीन अत्याधुनिक इमारतीचा उद्घाटन सोहळा उलवे नोड येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत मे महिन्यात झाला होता. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी एक संयमी, शिस्तबद्ध आणि लोकांसाठी काम करणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांचा गौरव केला. यावरून त्यांच्या कार्याचा अंदाज येतो.

संयमी नेतृत्वाचा त्यांचे अनुयायी नेहमी आदर करतात. संयमामुळे यशस्वी नेतृत्वाचे व्यक्तिमत्त्व सुंदर बनते. सुप्रसिद्ध लेखिका व शिक्षण तज्ज्ञ क्षिप्रा शहाणे म्हणतात, नदीला तीराचं बंधन आहे. अथांग पसरलेल्या समुद्राला किनाऱ्याचं बंधन आहे. वृक्षाच्या मुळात संयम आहे. तंतुवाद्याच्या तारा संयमित आहेत, म्हणून त्यामधून मधुर स्वर निघतात.

संयमामुळे आज आमदार प्रशांत ठाकूर यशाच्या शिखरावर पोहचलेले आहेत. यशाची वाट चालताना त्यांनी संयम केव्हाही ढळू दिला नाही अगर सोडला नाही. विविध क्षेत्रांत काम करण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक असते आणि त्यासाठी संयम महत्त्वाचा असतो.

आमदार प्रशांत ठाकूर यांना आयुष्यात मौल्यवान असे जे काही मिळत गेले ते शिस्तीमुळे मिळालेले आहे. मग ते यश सामाजिक, राजकीय किंवा इतर क्षेत्रातील असो. सर्वांसाठी वेळ, वेळेत सर्वकाही हे त्यांचे तत्त्व आहे. ते म्हणतात, शिक्षणासारखे दुसरे पवित्र कार्य नाही. यश मिळविण्यासाठी ज्ञान हे महत्त्वाचे साधन आहे. ज्ञानप्राप्ती हेच मानवाच्या उन्नतीचे सर्वोत्कृष्ट साधन आहे. ज्ञानामुळे मनाला शांती मिळते.


रायगड जिल्हा परिषदेची पनवेल तालुक्यातील चेरवली शाळा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दत्तक घेतली आहे. गेल्या सात वर्षांपासून त्यांचा बालमित्र सचिन पाटील यांच्या माध्यमातून शाळेला दरवर्षी भौतिक व शैक्षणिक सुविधांसाठी लाखमोलाची आर्थिक मदत केली जाते. यावर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शाळेसाठी संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच वायफाय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक २, हुतात्मा हिरवे गुरुजी शाळा (दगडी शाळा) येथील इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची पुस्तके व प्रश्नसंचांचे वितरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांचे रयत शिक्षण संस्थेशी अतूट नाते आहे. त्यांनी व कुटुंबीयांनी या संस्थेस कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर महिला सक्षमीकरणाला अत्यंत महत्त्व देतात. महिलांमध्ये आत्मविश्वास व सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे उपक्रम राबवितात. त्यांच्या मते हळदीकुंकू, खेळ पैठणीचा यांसारखे उपक्रम राबविल्यामुळे सामाजिक सहभागाची प्रेरणा मिळते. हे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असतात. विचुंबे येथे दुर्गामाता महिला मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ विचुंबे यांच्या संयुक्त विद्यमाने लाडकी बहीण मेळावा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला तसेच खानाव येथेही लाडक्या बहिणींचा मेळावा उत्साहात झाला.

धार्मिक, आध्यात्मिक, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांचा सत्कार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नेहमीच करण्यात येतो. ते म्हणतात, महिला आणि पुरुष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महिला या त्यागमूर्ती असल्याने त्यांचा मान-सन्मान झाला पाहिजे. महिलांचे कार्य उदात्त असते. पनवेलमध्ये ४२५० महिलांना घरघंटी व शिलाई मशीन वाटण्याचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाला.

'तंदुरुस्त शरीरात तंदुरुस्त मन वास करते' हे लक्षात ठेवून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले लक्ष्य पनवेलकरांच्या आरोग्यावर केंद्रित केले. ते म्हणतात, ''आरोग्य ही देवता आहे. आपले आरोग्य संपत्ती आहे. शरीरसंपदा उत्तम असेल तर सेवाभाव व मदत करण्याची वृत्ती निर्माण होते. आत्मविश्वास वाढतो. कार्यकुशलता वाढते. आपले शरीर निरोगी व स्वास्थ्यपूर्ण असणे हीच खरी आपली संपत्ती असते.''



नवीन पनवेल येथील आरोग्य शिबिर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिराचा ३६० नागरिकांनी लाभ घेतला. खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः रक्तदान करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या मतानुसार रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून अशा शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मोठी मदत होते.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणतात, आपल्या जीवनात स्वच्छतेचे अतिशय महत्त्व आहे. चांगल्या संस्कृतीचे पहिले लक्षण स्वच्छता हे आहे. शुचिता या सद्गुणावर भारतीय संस्कृतीचा प्राचीन काळापासून कटाक्ष आहे. स्वच्छ परिसर, स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, वातावरण प्रत्येकाला हवे असते. आमदारसाहेबांच्या सततच्या प्रयत्नांमुळे शासनाच्या 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' या योजनेस बळ मिळाले. निसर्ग मित्र, पनवेल या संस्थेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गाढी नदीच्या साफसफाईची मोहीम हाती घेण्यात आली. पनवेल महापालिकेमार्फत 'एक दिन एक तास एक साथ' मोहिमेंतर्गत स्वच्छता महाश्रमदान मोहिमेचे भव्य आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. संत मदर तेरेसा म्हणतात की, ''जर आपल्यापैकी प्रत्येकाने आपल्या दरवाजासमोरचा कचरा जरी काढला, तरी संपूर्ण जग स्वच्छ व सुंदर होऊन जाईल.''

वाढत्या शहरीकरणात होणाऱ्या प्रदूषणावर उपाय म्हणून वृक्षारोपण करणे अतिशय गरजेचे आहे. याच उद्देशाने पनवेल तालुका प्रेस क्लब आणि महापालिका यांच्या माध्यमातून पनवेल येथील दि.बा. पाटील विद्यालय या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यापूर्वी पनवेल ते मानखुर्दपर्यंत ११ हजार वृक्षांचे रोपण व त्यांचे संवर्धन करण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कळंबोली येथेही वृक्षारोपण करण्यात आले होते.

विविध क्षेत्रांत आणि कार्यक्रमांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचा वावर असतो. पाले खुर्द जि.प. शाळेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन तसेच स्मार्ट पे किऑस्क मशीनचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. 'भरारी २०२६' : गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करिअर मार्गदर्शन शिबिर लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील आणि नगरसेवक परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. 'पुरवैया' स्वरोत्सव प्रशांत ठाकूर यांच्या सहयोगातून झाला.

आमदार प्रशांत ठाकूर घरी येणाऱ्यांचे नमस्कार करून हसतमुखाने स्वागत करतात. त्यांच्या स्मितहास्यामुळे प्रत्येक जण भारावून जातो. हसणारा चेहरा सर्वांना आवडतो. त्यांच्या यशात त्यांच्या आत्मविश्वासाचे, मधुर हास्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. विचारवंत म्हणतात, हास्यामुळे घरात आनंद निर्माण होतो, व्यवसायात नावलौकिक वाढतो, सर्वांसाठी हास्य आशेचा किरण आहे.

आमदार प्रशांत ठाकूर अत्यंत वाचनप्रिय आहेत. त्यांच्या वाढदिवसाला ते फक्त पुस्तकेच भेट म्हणून स्वीकारतात. ते म्हणतात, माझ्या यशात वाचनाचा मोठा वाटा आहे. वाचन ही माणसाच्या विचारसरणीला आकार देणारी साधना आहे. चांगल्या प्रकारचे वाचन हे यशासाठी एक मार्गदर्शक ठरते. वाचनामुळे जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. वाचनाची सवय मी लावून घेतली आहे. माझे, बाबांचे तसेच परेशचे घर पुस्तकांनी भरलेले आहे. याबद्दल बाबांचे आभार मानायला हवेत.

नम्रता हा आमदार प्रशांत ठाकूर यांचा सगळ्यात महत्त्वाचा गुण आहे. एवढा एक गुणही त्यांना मोठेपणा देण्याला पुरेसा आहे, पण त्याच्या जोडीला साधी राहणी, चारित्र्यसंपन्नता, त्यागाची वृत्ती, समाजहित बुद्धी, विश्वासपालन, चांगल्या वाचनाची आवड, नवनवीन माहिती मिळविण्याची जिज्ञासा, सेवा, सहाय्य, सहकार्य, मदत, दान, परोपकार, प्रयत्नवाद, सकारात्मक दृष्टिकोन या गुणांनी त्यांच्या मोठेपणाला अधिक शोभा आली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आपल्या भाषणात आर्जवी, विनयशील, मधुर, आपुलकी दर्शक, सौम्य भाषेचा प्रयोग करतात. त्यांचा शांत स्वभाव संपूर्ण समाजास सन्मार्गावरून चालण्यास प्रवृत्त करतो. ते आपल्या शब्दांचा, आपल्या भाषेचा उपयोग नेहमी दुसऱ्यांच्या उत्कर्षासाठी किंवा आशीर्वादासाठीच करतात.

समर्पिततेने सतत कार्यशील असणारे, सर्वोत्कृष्टतेची बांधिलकी स्वीकारणारे, संस्कृती, मूल्ये, आदर्श जपणारे, पनवेलकरांविषयी कमालीची आस्था, जिव्हाळा बाळगणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचा आज वाढदिवस. त्यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**-प्रा.डॉ. विजयकुमार रणदिवे,**
पनवेल

---

# प्रेरणादायी दीपस्तंभ

**प्र - प्रसन्न हास्य**
**शां - शांत मुद्रा**
**त - तळपणारे तेज**

ज्यांच्या नावातच तेजोमय शांतता आहे असे पनवेलचे लाडके आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

वाढदिवसाचं फक्त निमित्त, सर्वांच्या हृदयसिंहासनावर आरूढ झालेल्या या आमदारांवर लिहिताना खरोखरंच अनुभवांची खाण रिती करावी असंच वाटतं.

आमचे विद्यालय अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठेचे चेअरमन म्हणजेच प्रशांत ठाकूर सर ज्यांच्या सानिध्यात येणाऱ्या कोणाही व्यक्तीला परिसस्पर्श झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्याकडून कोणते आणि किती गुण घ्यावेत याला काही मर्यादाच राहत नाही. म्हणजे एखाद व्यक्तिमत्त्व असं असतं की आपण नुसतं पाहिलं तरीसुद्धा त्या व्यक्तिमत्त्वात असणारे गुण आपणही घ्यावेत असं वाटतं. हो, इतके सहज आणि भरपूर असे गुण त्यांच्याकडून घ्यावेत असं नेहमी वाटतं. कामोठे सेक्टर ६ मधील आमचे लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय ज्याबद्दल सरांना नेहमीच एक वेगळ्या प्रकारची आपुलकी, आपलेपणा वाटतो. हे विद्यालय नावारूपाला यावं, अजून खूप मोठं व्हावं अशी त्यांची मनीषा नेहमीच असते. त्यासाठी ते सर्वतोपरी आम्हाला मदत करायला उत्सुक असतात. हा... पण नुसतेच उत्सुक नाही, तर त्यासाठी आम्हाला सढळ हाताने मदतही करतात. मग ती मदत फक्त शाब्दिक नसते तर ती आर्थिकसुद्धा असते.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व हे अगदी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारे असेच आहे. अशी एक आदर्श पितापुत्राची जोडी म्हणून पनवेल तालुक्यात त्यांचं नाव तर आहेच, पण मी जे जवळून पाहिलेले प्रशांत सर आहेत त्यांच्याबद्दल काय लिहावं आणि नक्की सुरुवात कुठून करावे असाही प्रश्न मला पडतो. शिक्षणावर निस्सीम प्रेम असणारे हे आमदार म्हणजे विद्यालयाच्या संपूर्ण विकासासाठी सातत्याने झटत राहणारे आहेत. आमच्या विद्यालयामध्ये १५ ऑगस्ट या दिवशी अर्थातच प्रमुख अतिथी म्हणून आम्ही त्यांना पाचारण करतो. 'वेळेची जे किंमत करतात वेळ त्यांची किंमत करते' वेळेचं महत्त्व आणि वेळेचे नियोजन हे कोणाकडून शिकावं तर आमदारसाहेबांकडून शिकावं. ते झेंडावंदनासाठी निर्धारित वेळेच्याही आधी येतात. झेंडावंदन अर्थात ध्वजाचा मान हेही कारण असतंच. अर्थात ही वेळेची जी सवय आहे ती आम्हाला व्यक्तिगत आयुष्यातही निश्चितच उपयोगी पडते. इतिहास घडवण्याची दृष्टी आणि वर्तमान बदलण्याची ताकद असणारे आमदारसाहेब म्हणजे "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" या उक्तीत अत्यंत चपखल बसतात.

आमदारसाहेब केवळ सल्ला देण्याचे काम करत नाहीत तर ती कृती ते आधी स्वतः करतात आणि मग सांगतात. अगदी "आधी केले आणि मग सांगितले" याप्रमाणे आमच्या विद्यार्थ्यांनीही त्यांचा हा गुण जोपासला आहे. म्हणूनच स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी जेव्हा झेंडावंदनाच्या कार्यक्रमाला आमदारसाहेब आमच्या विद्यालयात येतात तेव्हा आमच्या लहान मुलांचं ते तोंडभरून कौतुक करतात. इतका मोठा माणूस पण लहान मुलांमध्ये रमताना ते अगदी लहान मुलांसारखे होऊन जातात, त्या मुलांचा ते स्वतः व्हिडीओ काढतात आणि त्यांना प्रोत्साहनही देतात. विद्यालयातील विद्यार्थ्यांची भाषण ते अगदी मन लावून ऐकतात आणि त्या मुद्द्यांवर विशेष टिपणीही देतात. विद्यार्थ्यांना मग जोमाने पुन्हा भाषण करावसं वाटतं. आणि त्यांच्यामध्ये एक ऊर्जा संचारली जाते. अगदी सूत्रसंचालनापासून ते आभार प्रदर्शनापर्यंत ते सर्व काही नीट ऐकतात. विशेष करून आमच्या पूर्व प्राथमिक विभागाचे छोटे बाल चमू जेव्हा आभार प्रदर्शनाचे काम करतात, त्या वेळेला तर ते अत्यंत मंत्रमुग्ध होऊन त्या मुलांचं कौतुक करतात आणि मग आम्ही सगळेच जण त्यांच्या या अनोख्या वागण्याने अगदी भारावून जातो. मग लक्षात येतं की माणूस कितीही मोठा असला तरी किती विनम्र असतो हे आम्हाला साक्षात पाहायला मिळतं.




शिक्षण हे मृत्यूलोकावरचे अमृत आहे, हे अगदी पदोपदी पटलेल्या आमदारसाहेबांनी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची जणू जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक, क्रीडा, सांगीतिक, शैक्षणिक, अभ्यास, बाह्य परीक्षा या सगळ्यांवर त्यांची बारीक नजर असते. विद्यार्थ्यांनी अशा विविध क्षेत्रात आपली कामगिरी सातत्याने चमकवत ठेवावी असं त्यांना वाटतं आणि म्हणूनच आमच्या विद्यालयातील संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी जेव्हा स्पर्धेकरीता संगीत साधनांची मागणी केली त्यावेळेला त्यांना अत्यल्प वेळात त्यांनी सारी साधने उपलब्ध करून दिली तीही स्वखर्चाने. विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी कोणतीही कमतरता भासणार नाही याची ते नेहमीच काळजी घेतात. या व्यतिरिक्त क्रीडा स्पर्धांमध्ये जेव्हा आमच्या विद्यालयाला District Sports Office Panvelमध्ये सर्वाधिक सहभाग घेतल्याबद्दल आणि पारितोषिके मिळवल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून काही रक्कम अनुदान म्हणून मिळाली. त्यावेळी त्यांनी आमचं कौतुक तर केलंच, पण हे कौतुक नुसत कोरडं नव्हतं बरं का, त्यांनी जेवढी रक्कम आम्हाला बक्षीस म्हणून मिळाली तेवढीच रक्कम त्यांनीही दिली आणि विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार खेळाचे साहित्य खरेदी करा, असंही सांगितलं.

पनवेल महानगरपालिकेतर्फे दरवर्षी शिवजयंतीनिमित्त मिरवणूक काढले जाते. त्यात आमच्या विद्यालयानेही सहभाग घ्यावा अशी इच्छा आमदारसाहेबांनी बोलून दाखवली. आम्हाला थोडीशी धाकधूक होती की इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्याला या स्पर्धेत भाग घेता येईल का, पण आम्हाला पाठबळ आमदारसाहेबांनीच दिलं, शिवाय त्यासाठी आर्थिक मदतही केली. या स्पर्धेत तुम्ही नक्की भाग घ्या, तुम्ही नक्की जिंकू शकाल हा विश्वासही त्यांनी दिला आणि हाच विश्वास आमच्या विद्यालयाने त्यांना सार्थ करून दाखवला. सलग तीन वर्षे आमच्या विद्यालयाने या स्पर्धेत नुसता भागच घेतला नाही, तर बक्षीसही मिळवून दाखवलं आणि याचे कौतुक आमदारसाहेबांच्या डोळ्यांमध्ये आम्हाला दिसलं, ज्या वेळेला पारितोषिक वितरणाचा सोहळा संपन्न झाला, त्यावेळी प्रत्येक विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकाचे त्यांनी न चुकता अभिनंदन केलं.

एका संस्कृत सुभाषितानुसार फळांनी गच्च भरलेलं झाड जे असतं, ते नेहमी विनम्र असतं. अगदी तसेच गुणांनी युक्त असे आमदारसाहेब हे विनम्र तर आहेतच, पण त्यांच्या वाणीमधला गोडवा आणि सतत विद्यार्थ्यांबद्दल असणारी तळमळ ही आम्हाला नवनवीन प्रयोग करण्यासाठी प्रेरणा देत असते. त्यांच्याच प्रेरणेतून आम्ही विद्यार्थ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देतो आणि आमचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी स्वतःची चमक दाखवून देतात. आपले विद्यालय हे ग्रीन झोन व्हावं तसेच प्लास्टिकचा वापर टाळून सोलर एनर्जीवर लाईट असाव्यात असा प्रस्ताव त्यांनी मांडला आणि तो नुसताच मांडला नाही तर आज विद्यालयात असा सोलार प्लांट तयार झालेला आहे आणि तो कार्यरतही आहे.

आमच्या विद्यालयाला उपक्रमशील विद्यालयाचा पुरस्कार जो रयत शिक्षण संस्थेकडून दिला जातो, तो ज्यावेळी आम्हाला मिळाला त्यावेळी आमदारसाहेब उपस्थित होते आणि तो पुरस्कार विद्यालयाचे चेअरमन म्हणून त्यांनी स्वीकारला. याव्यतिरिक्त censor energy आणि foot step energy ही संकल्पनासुद्धा त्यांनी मांडली आहे जी लवकरच कार्यान्वित होईल अशी मला एक प्राचार्य म्हणून नक्कीच खात्री वाटते. विद्यालयातलं कंपोस्ट खत असो किंवा रेन वॉटर हार्वेस्टिंग असो विद्यालयात विविध सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असतो.

अरे हो! एक सांगायचंच राहिलं मी आधी म्हटल्याप्रमाणे विनम्र माणसाचे किती आणि कोणते कोणते गुण घ्यावेत असा प्रश्न खरंच पडत राहतो. आमदारसाहेबांच्या वागण्यातला एक गुण मी तुम्हाला सांगणार आहे. आमच्या विद्यालयात जेव्हा ते पाहणी करायला येतात त्या वेळेला ते लिफ्टचा वापर करत नाहीत. सहाही मजले ते चढतात आणि उतरतातसुद्धा. म्हणजे मी कुणी वेगळा आहे किंवा मी कुणीतरी स्पेशल आहे अशी भावना विद्यालयात आल्यानंतर किंबहुना कुठेच त्यांची नसावी अशी मला खात्री आहे. विद्यालयातल्या प्रत्येक विद्यार्थ्याचा गुणगौरव करायला ते कधीच विसरत नाहीत. त्यांच्या चाणाक्ष नजरेतून कोणतीही गोष्ट सुटत नाही. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच त्यांचं ध्येय असतं. हे झालं विद्यार्थ्यांच्या बाबतीत. शिक्षकांनाही त्यांच्या कृतीतून नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. मी आधी दिलेल्या उदाहरणांप्रमाणे आम्हाला वेळेचे बंधन पाळणं हा गुण तर आम्ही त्यांच्याकडून शिकलो, मात्र त्यांच्या नजरेतून जसं एखादं व्यक्तिमत्त्व घडतं किंवा छोट्या छोट्या गोष्टी सुटत नाहीत अगदी तसंच आता मला आणि माझ्या संपूर्ण स्टाफलासुद्धा याच शिस्तीची सवय लागली आहे बरं का. थोडक्यात शिस्त, वेळेचं बंधन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही त्रिसूत्रीच आम्ही त्यांच्याकडून शिकलो असं म्हटलं तरी ते वावगं ठरणार नाही. कारण त्यांचा स्वभाव गंभीर नाही तर खंबीर आहेत, त्यांच्या विचारांना तलवारीची धार आहे. कोणत्याही समस्येचं उत्तर म्हणजे सर्वांचे लाडके आमदारसाहेब आहेत.

युवकांना पुढे नेण्यासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरतं अशा युवा खंबीर नेतृत्वाला मनापासून अभिवादन, त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन!

**-स्वप्नाली संजय म्हात्रे,**
प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे

---

# क्रीडाप्रेमी आमदार



आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि क्रीडा क्षेत्र हे सखोल नाते आहे. पनवेलमधील खेळाडूंचे ते आधारस्तंभ आहेत. कारण ते तरुण पिढीचा विचार करतात.

पनवेलसह रायगड जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. खेळाडूंप्रति त्यांचे असलेले प्रेम, जिव्हाळा आणि आत्मियता आम्ही रायगड तायक्वांदो असोसिएशनच्या माध्यमातून अगदी जवळून अनुभवली आहे. तायक्वांदोचा कोणताही कार्यक्रम असो, स्पर्धा असो किंवा खेळाडूंच्या प्रोत्साहनाचा कोणताही उपक्रम असो दादा नेहमी आवर्जून उपस्थित राहतात. त्यांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंमध्ये नवी ऊर्जा निर्माण होते आणि आयोजकांनाही मोठा आधार मिळतो. तायक्वांदोबद्दल त्यांना असलेले विशेष प्रेम आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. फक्त उपस्थितीपुरतेच नव्हे, तर खेळाडूंना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात.

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून आधुनिक इनडोर स्टेडियम उभारण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखवलेली तयारी ही भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दूरदृष्टीची बाब आहे. उलवे नोड येथे उभारलेले रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स हे त्यांच्या क्रीडाविषयक दृष्टिकोनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या क्रीडा संकुलामुळे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील याची आम्हाला खात्री आहे.


प्रशांतदादांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान केवळ तायक्वांदोपुरते मर्यादित नसून विविध खेळांच्या विकासासाठी त्यांनी दिलेला पाठिंबा अतिशय मोलाचा आहे. अशा लोकप्रतिनिधींची आजच्या समाजाला नितांत गरज आहे.

दोन वर्षांपूर्वी वाढदिवसानिमित्त दादांनी स्पष्ट सांगितले होते की, "मला फुलगुच्छ नकोत, भेटवस्तू नकोत." त्यांच्या या विचाराने प्रेरित होऊन आम्ही एक सामाजिक संकल्प केला. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि स्वावलंबनासाठी मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू केले. आज रायगड जिल्ह्यातील ७५६ जिल्हा परिषद शाळांमध्ये हजारो मुली आणि महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हीच आमच्याकडून दादांना वाढदिवसाची खरी आणि अर्थपूर्ण भेट आहे.

रायगड तायक्वांदो असोसिएशनतर्फे आम्ही परमेश्वराकडे एकच प्रार्थना करतो की, प्रशांतदादा ठाकूर यांना उत्तम आरोग्य आणि अधिक मोठ्या जबाबदाऱ्या लाभोत. भविष्यात त्यांनी राज्यस्तरावरून खेळाडूंसाठी कार्य करावे, हीच आमची मनापासून इच्छा आहे.

दादा, आपण खेळाडूंच्या पाठीशी सदैव उभे राहिलात, त्यांच्या स्वप्नांना बळ दिलंत आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा दिलीत. आपले हे कार्य असेच अखंड सुरू राहो आणि खेळाडूंसाठी आपण प्रेरणास्थान बनून राहावेत, याच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

**-सुभाष पाटील,**
आंतरराष्ट्रीय तायक्वांदो पंच



05 Aug.
लोकप्रिय
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
Raman N. Bohara
Balaji Stone Crushing Plant
Site : At. Bombavi Pada, Post Owle, JNPT, Ex. Highway, Near Gavhan Phata, Tal. Panvel, Navi Mumbai-410206.
Off. : 170, M. G. Rd., Mahavir Chowk, Behind Amantran Hotel, Panvel, Navi Mumbai. Tel. 022-27451406. Telefax : 022-27461800.




कर्तव्यदक्ष
आमदार
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
गौरव अजय कांडपिळे
उपाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा भाजपा
अजय यशवंत कांडपिळे
मा. नगरसेवक पनवेल, मा. चेअरमन पनवेल को ऑप अर्बन बँक
BHARATI AUTO CARE CENTRE
(Dealers of Hindustan Petroleum Corporation Limited)
Address: HP Petrol Pump, Survey No. 29/C, 30/0, Palidevad, Sukapur, Panvel, Raigad, Maharashtra 410206.
Email: bhartiautocare@gmail.com | gauravkandpile@yahoo.in




अवघी सारी जनता जाणते
तुमच्या कर्तृत्वाची चाहूल,
पनवेलच्या प्रगतीच्या दिशेने पडलेले
तुमचे प्रत्येक पाऊल..!
5 ऑगस्ट
दमदार आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
शंकर नागराणी
(उल्हासनगर)




सर्वसामान्य जनतेचे प्रश्न
सोडवण्यासाठी सदैव तत्पर असणारे
कार्यसम्राट
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब
5 ऑगस्ट
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
विजय चिपळेकर
मा. नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका




चिटणीस भाजपा महाराष्ट्र
दमदार
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
विकास ना. घरत
नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका
डॉ. अरुणकुमार शं. भगत
नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका




COURTYARD
WATER FRONT RESIDENCES
COURTYARD LOCATION ADVANTAGES
Near Panvel Station
Close to Expressway
Near Proposed InternationalAirport
Convenient Amenities Nearby
Near Panvel Bus Depo
Short Drive to Central Park
Lakhanis
BENCHMARK OF EXCELLENCE
60+ Projects Delivered
5000+ Happy Families
30+ Years of Legacy
5 Million+ Sq.ft. Delivered
0702 603 7899
www.lakhanibuilders.in




बुलंद
ध्यासाचा
निर्भिड वृत्तीचा
दमदार नेता..
लोकप्रिय
श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
विघ्नेश
एंटरप्राइजेज





अगणित माणसे या जगात जन्मास येतात, पण तुमच्यासारखे
यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. अशोक मोटे
मा. जिल्हा सचिव
उत्तर रायगड भाजपा




चिटणीस भाजपा महाराष्ट्र
दमदार
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
05 Aug.
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री.अमर अरुण पाटील
अध्यक्ष- कळंबोली शहर मंडल,
मा. स्थायी समिती सभापती नगरसेवक-पनवेल महानगरपालिका


5 ऑगस्ट
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
दमदार आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. सुरेश पाटील
राष्ट्रीय महामंत्री : भारतीय मजदूर संघ
(पोर्ट अँड डॉक महासंघ)
सदस्य : वेतन करार समिती
(बीडब्ल्यूएनसी), आयपीए दिल्ली
जिल्हाध्यक्ष : भारतीय मजदूर
संघ, रायगड
अध्यक्ष : जेएनपीए
जनरल कामगार संघटना


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
PRIYAL
Enterprises
Mr. Sachin Patil
Real Estate Consultant
Maha Rera No. A52000011616
+91 9867415747 ▪ patilsachin1177@gmail.com


5 ऑगस्ट
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
विजय मनोहर
खानावकर
नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका


कीर्ती तुमची
चहूदिशांना,
कर्तृत्वाने गाठले
आकाश!
ध्यानी मनी एकच ध्यास
पनवेलचा
सर्वांगीण विकास!!
5 ऑगस्ट
कार्यसम्राट
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
प्रकाश ठाकूर
वसंतराव नाईक कृषी भूषण
पुरस्कारप्राप्त (महाराष्ट्र शासन)
परीक्षित ठाकूर
उरण तालुकाध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी


सर्वसामान्य जनतेचे
प्रश्न सोडवण्यासाठी सदैव
तत्पर असणारे
लोकप्रिय
आमदार
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
सुमित झुंजारराव
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
अध्यक्ष, भाजपा पनवेल शहर


5 ऑगस्ट
विकासाची दृष्टी ठेवून,
रचनात्मक काम करणारा
उत्तम संघटक..
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. भुपेंद्र पाटील
उपसभापती,
पनवेल पंचायत समिती


श्री स्वामी समर्थ
5 ऑगस्ट
सर्वसामान्य माणूस
केंद्रस्थानी ठेऊन
कार्यरत असणारे
दमदार
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. रमेश
सिताराम पाटील
मा. उपसरपंच ग्रु.ग्रा. दुंदरे
स्वामी समर्थ बिल्डर्स एंड डेव्हलपर्स


५ ऑगस्ट
सर्वसामान्य जनतेचे प्रश्न
सोडवण्यासाठी
सदैव तत्पर असणारे
कर्तव्यदक्ष
आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
With best compliments from
SUSHEEL GROUP
BUILDERS & DEVELOPERS
+91-9820198242
022-27452321/27453121
kasatg@yahoo.com
Ground Floor, 756, Kapad Bazar,
Panvel - 410206-Raigad.


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
कार्यसम्राट
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
With Best Compliments From
DR. SHIVANGI SINGH
OPHTHALMOLOGIST
MS (Opthalmology), FRVS, MBBS
+91 88 608 799 88 | shivangi.ophthal@gmail.com
Dr. Singh's City Hospital, Plot No-32,
Sector-4, Kalamboli, Navi Mumbai - 410218
• CATARACT SURGERY (PAINLESS, SUTURELESS)
• VITREORETINAL DISEASES
• CORNEAL DISEASES
• EYELID DISEASES
• GLAUCOMA
• DIABETIC RETINOPATHY
Dr. Ateev Singh
Aesthetic & Plastic Surgeon
M.Ch, MS (Gold Medallist), MBBS, FCAPS, FCGIE
+91 9819636506/ 8691889988/ 769610790
ateev24@hotmail.com
Dr. Singh's City Hospital, Plot No-32, Sector-4, Kalamboli, Navi Mumbai, Maharashtra - 410218
SERVICES AVAILABLE
• GYNAECOMASTIA SURGERY
• COSMETIC BREAST SURGERY
• LIPOSUCTION
• BODY CONTOURING
• FAT GRAFTING
• RHINOPLASTY
• SCAR REVISION
• THREADS, FILLERS, BOTOX
• LASERS (SCAR, TATTOO REMOVAL, PIGMENTATION, VASCULAR LESION)
• LASER HAIR REMOVAL
• MNRF
• BURNS
• CONGENITAL & TRAUMATIC HAND
• SURGERY
• DIABETIC FOOT
• TRAUMA SURGERY
• MAXILLOFACIAL SURGERY
• AV FISTULA
• VASCULAR SURGERY
• RECONSTRUCTIVE SURGERY
• PRP
• HAIR TRANSPLANT


कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
SAI PRINTERS
innovative printing brilliant result
Print WORLD
•print•copy•design•digital
Mob. No.: 9987291017/9773361003/8082082082/9870370307
Off. 1: At. Kopar, Post. Gavhan, Tal. Panvel, Dist Raigad.
Off. 2: 401, NMS Icon, Plot No. 194, Sector-19, Ulwe, Navi Mumbai.
Email: sai.printers15@gmail.com/printworld.ulwe@gmail.com


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
आमदार
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
अजय तुकाराम बहिरा
मा. स्थायी समिती सदस्य, नगरसेवक, पनवेल महानगरपालिका (प्र. क्र. २०, पनवेल)
श्रेयश तुकाराम बहिरा


आमदार मा. श्री.
विकासाची दृष्टी ठेवून, रचनात्मक काम करणारा उत्तम संघटक...
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
प्रविण पाटील
अध्यक्ष, खारघर मंडल भाजपा
माजी सभापती, स्थायी समिती
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका


कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
OMS
OM POWER SYSTEM
AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY
वैभव ठाकूर
तुषार ठाकूर
Government Registered Contractor
Complete Solution For Your Electrical, Fabrication & Civil Work, Fabrication Works - Industrial Shed, Structural Fabrication, Building Turnkey Projects Electrical Work - Industrial Wiring, H.T./L.T., MSEDCL Power Sanctioning etc.
Office Address : 102, R. Residency, Plot- 39, Sec-19, Behind Hotel Malwan Tadka, Ulwe Node, Navi Mumbai - 410 206


कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सौ. प्रमिला रविनाथ पाटील
उपमहापौर, पनवेल महानगरपालिका
नगरसेविका, प्रभाग क्रमांक (७)
रविनाथ चरु पाटील
चिटणीस, उत्तर रायगड जिल्हा भाजपा


5 ऑगस्ट
लोकप्रिय
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
किसन वा. पवार
अध्यक्ष, आनंद ज्येष्ठ नागरिक संघ (रजि.), नवीन पनवेल


कर्तव्यदक्ष
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब
5 ऑगस्ट
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक : श्री. किरण माळी
मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कराडे खुर्द


लोकसेवेसाठी सतत कार्यरत असणारे कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. उत्तम कोळी
अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्ती
वहाळ ग्रुप ग्रामपंचायत उलवे नोड, नवीमुंबई


कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
Proprietor
Mr. Rajesh Vedak
(9820469663)
INNOVATIVE SYSTEMS
Sales & Service in Desktop Laptop, UPS, CCTV & Peripherals
Shop No.2, Mauli Darshan, M. J. Phule Road, Panvel - 410206.
TEL No. :022-27466690. E-MAIL : innovative.systempanvel@outlook.com
Quick Heal
EPSON
SAMSUNG


आमदार मा. श्री.
बुलंद ध्यासाचा निर्भीड वृत्तीचा दमदार नेता..
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. बबन नामदेव मुकादम
स्थायी समिती सभापती,
नगरसेवक, पनवेल महानगरपालिका


05 Aug.
कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. रवी नाईक
जिल्हासंयोजक, कामगार आघाडी उत्तर रायगड
सौ. वर्षा रवी नाईक
माजी नगरसेविका (पनवेल नगरपरिषद)


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
मा.श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
रवी गोवारी
भाजप कार्यकर्ते
सौ. हेमलता गोवारी
मा. नगरसेविका


पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
मा.श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
बबनराव दा. बारगजे
जिल्हाध्यक्ष, भाजपा भटके विमुक्त मोर्चा उत्तर रायगड
सौ. बायजा बबन बारगजे
नगरसेविका, पनवेल महानगरपालिका
भाजपा चिटणीस कळंबोली मंडळ


आमदार मा. श्री.
तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे..!
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
रवींद्र जोशी, नगरसेवक
पनवेल महानगरपालिका



5 ऑगस्ट
लोकसेवेसाठी सतत कार्यरत असणारे कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
शुभेच्छुक
भारतीय जनता पार्टी कोन व पदाधिकारी, ग्रामस्थ मंडळ, कोन, ता. पनवेल.
निलेश म्हात्रे
(मा. सरपंच, कोन)
दिपक म्हात्रे
(भाजपा कार्यकर्ते)



पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार
मा.श्री. प्रशांतजी ठाकूर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे
मा.विरोधीपक्ष नेता. पनवेल महानगरपालिका
सौ.ममता प्रितम म्हात्रे
सभापती.महिला-बालकल्याण समिती. प.म.पा.




बुलंद ध्यासाचा
निर्भीड वृत्तीचा
दमदार नेता..
05 Aug.
कर्तव्यदक्ष आमदार
मा.श्री. प्रशांत ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
With Best Compliments From
TechNova

Developed By
MAHAAVIR
MAHAAVIR LABDHI
BEAUTIFUL SEA FACING 2 & 3 BHK APARTMENT'S
At URAN, Near Atal Setu & Navi Mumbai Airport
WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
Happy Birthday
SHRI. PRASHANT THAKURJI (MLA - Panvel)
Ongoing Sea Facing Project
Site Add.: Mahaavir Labdhi located at CTS No.420A, 420B, 420C, 420D and 403, Village Mhatavli, Taluka Uran, Dist. Raigad
Call: 98673 11345 / 022-41572600
MahaRERA Registration No.: P52000045246 & is available on the website https://maharera.mahaonline.gov.in | *T&C APPLY
Corporate Add.: Mahaavir Buildcon LLP, 302-306, Persipolis, Plot - 74, Sector - 17, Vashi, Navi Mumbai 400 703 | www.mahaavir.com




5 ऑगस्ट
सर्वसामान्य जनतेचे प्रश्न
सोडवण्यासाठी सदैव तत्पर असणारे
कार्यसम्राट
आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!





WellPure™
Timeless beauty, powered by nature
Keshasvi™
Your secret for beautiful hair
Buy Now
gandhar® group
Follow us at
@naturepurewellness
Also available on




5 ऑगस्ट
अवघी सारी जनता जाणते
तुमच्या कर्तृत्वाची चाहूल,
पनवेलच्या प्रगतीच्या दिशेने पडलेले
तुमचे प्रत्येक पाऊल..!
आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
एक हितचिंतक





05 Aug.
अगणित माणसे या जगात जन्मास येतात, पण
तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
चिटणीस भाजपा महाराष्ट्र
लोकप्रिय
आमदार
मा. श्री.
प्रशांत
ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
शुभेच्छुक
कृपाशंकर तिवारी

www.paradisegroup.co.in
MAHARERA NO.:
P52000053727
SAI WORLD CITY, 38 ACRE TOWNSHIP
PHASE 2 - READY POSSESSION
Club VEGAS
Artist's Impression
SAI WORLD CITY PANVEL
PROJECT HALLMARKS
G+33 Storeyed Towers
2, 2.5, 3 & 4 BHK Luxury Homes
Themed Landscaping
50,000 Sq.Ft. Club Vegas
World-class Amenities
LOCATION ADVANTAGES
Navi Mumbai International Airport - 5 Mins
Mumbai- Pune Expressway - 2 Mins
Delhi Public School (DPS) - 5 Mins
Mumbai Trans Harbour Link - 10 Mins
Panvel Railway Station - 7 Mins
Jawaharlal Nehru Port Trust (JNPT) - 20 Mins
Close proximity to Schools, Malls, Hotels and Banks - 5 Mins
PARADISE® GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
98330 90000
enquiry@paradisegroup.co.in
Site & Sales Office: Sai World City, Palaspe Phata Junction, Panvel - 410 206
Disclaimer: All the specification, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.


WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
HAPPY BIRTHDAY
SHRI. PRASHANT THAKURJI (MLA - Panvel)
SIMRAN MOTORS
EXPERIENCE THE NEW WAY OF LIFE
HURRY UP!
UNFORGETTABLE
DEALS ON
WHEELS!
"Your Dream Car, Now Within Reach"
Only At SIMRAN MOTORS
TAKE TEST DRIVE AND WIN ASSURED GIFTS
BOOK NOW
Also Available
S-CNG
SPECIAL OFFER
100% On-Road Funding*
Ever Highest Discounts*
Highest Exchange Bonus*
Spot Evaluation*
Affordable EMI*
Low Down Payment*
Visit Your Nearest Maruti Suzuki
Simran Motors Today !
*T&C Apply
MARUTI SUZUKI ARENA 9223589145
NEXA 8657759818
MARUTI SUZUKI COMMERCIAL 8691043034
TRUE VALUE 9223161420
OUR PRESENCE :
PANVEL 9223589145
AIROLI 9223161411
CHOWK 9373830579
KARJAT 9223589146
WADKHAL 9223161473
ALIBAG 9223161461
NAGOTHANE 9223161514
MANGAON 9223161426
MAHAD 9767006043
HEAD OFFICE (PANVEL):
Plot No. 2-8, Sector 15, Opp. Garden Hotel, Old Mumbai - Pune Highway,Panvel, Maharashtra 410206


Happy Birthday
SHRI. PRASHANT THAKURJI
(MLA - Panvel)
With Best Wishes From
NIPPON PAINT
Inspired by you
NIPPON PAINT INDIA PVT. LTD.
Survey No.6 – 22, Taloja – Ambernath Road,
Ghot Camp, Ghotchal, Taloja,
City: Panvel, Dist: Raigad, Maharashtra.


बुलंद ध्यासाचा
निर्भिड वृत्तीचा
दमदार नेता..
05 Aug.
पनवेल विधानसभा मतदारसंघाचे
कार्यसम्राट
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !
WITH BEST COMPLIMENTS FROM
AIS
Asahi India Glass Ltd.


WISHING YOU MANY MORE YEARS IN
YOUR MISSION TO CHANGE LIVES.
Happy Birthday
SHRI. PRASHANT THAKURJI (MLA - Panvel)
SAMARTH
(Prabhu Ali, Panvel)
GANESH KRUPA
(Opp. Nadkarni Hospital, Panvel)
JANKI
(S. N. Road, Panvel)
SHRADDHA
(Natyagriha Road, Panvel)
SNEHSHREE
(Natyagriha Road, Panvel)
+91-99304 99909
+91-99304 99099
+91-80802 57175
+91-80808 65909
NEELKANTH GROUP
O: Neelkanth Group, Office No. 706-710, 7th Floor, Neelkanth Landmark, Plot No. 365/1/2,
Mumbai - Pune Highway, Behind Orion Mall, Panvel - 410206.
E Mail : neelkanthassociates9099@gmail.com | neelkanthconstructions.group@gmail.com


(SIR) कार्यशाळा










भाजपा युवा मोर्चा
उत्तर रायगड








दादा















# कार्यतत्पर लोकप्रतिनिधी

सर्वप्रथम आदरणीय कार्यसम्राट आमदार प्रशांत रामशेठ ठाकूरसाहेब यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! "कार्यसम्राट" हा शब्द उगाच कुणालाही दिला जात नाही. अनेकांना प्रश्न पडत असेल की, असे काय कार्य केले आहे त्यांनी? तर हा प्रश्न त्या पिढीला विचारा, ज्यांनी नगराध्यक्षपदापासून सलग चार वेळा आमदार म्हणून त्यांचा कार्यकाळ जवळून अनुभवला आहे आणि त्या काळातील पनवेलचा बदल स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला आहे.

ज्या पिढीने रेडिओपासून ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही, कलर टीव्ही, जाड टीव्ही, फ्लॅट टीव्ही, कर्व्ह टीव्ही, दूरदर्शनपासून जिओ टीव्ही तसेच चार आण्यांपासून डिजिटल पेमेंटपर्यंतचा प्रवास अनुभवला, त्याच पिढीने प्रशांत ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली पनवेलचा झालेला अभूतपूर्व विकासही अनुभवला आहे. नगरपालिकेपासून महानगरपालिकेपर्यंत आणि महानगरपालिकेपासून जागतिक दर्जाच्या शहराकडे वाटचाल हा प्रवास सहज शक्य नव्हता. नियोजन, दूरदृष्टी, सातत्य आणि विकासाची प्रबळ इच्छाशक्ती यामुळेच पनवेलने ही झेप घेतली. म्हणूनच आजही पनवेलकर प्रशांत ठाकूरसाहेबांवर मनापासून प्रेम करतात आणि त्यांच्यावर विश्वास ठेवतात.

प्रशांतदादांचे राहणीमान नेहमीच अत्यंत साधे आणि सर्वसामान्य माणसासारखे असते. त्यांच्या वागण्यात किंवा बोलण्यात आपण आमदार आहोत याचा गर्व किंवा अहंकार कधीच जाणवत नाही. मी स्वतः अनेकदा त्यांना कोणताही व्हीआयपी स्टंट न करता इतर रुग्णांप्रमाणे ओपीडीमध्ये आपल्या क्रमांकाची शांतपणे वाट पाहताना पाहिले आहे. एकदा मी त्यांना विचारले, "दादा, तुम्ही असे रांगेत का बसला आहात?" त्यावर त्यांनी अगदी सहज उत्तर दिले, "नाही, माझा नंबर आहे. मध्ये जाणे चुकीचे आहे." हीच त्यांच्या साधेपणाची आणि नियमांचा आदर करण्याची खरी ओळख.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी फोनवर बोलताना ते नेहमी प्रथम, "बोलू शकतो का?" अशी विचारपूस करतात. दुसऱ्याच्या वेळेचा आदर करणारी ही सवय त्यांच्या संस्कारांची आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. अनेकदा आपण फोन केला आणि ते कामात व्यस्त असले, तरी नंतर आवर्जून स्वतः फोन करून, "काय अडचण आहे?" अशी विचारपूस करणारे हे लोकप्रतिनिधी आहेत. सामान्य माणसाच्या सुख-दुःखात धावून जाणारा, प्रत्येकाच्या अडचणीला स्वतःची अडचण समजणारा आणि पदापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व देणारा असा हा नेता म्हणजे प्रशांतदादा ठाकूर.

कोविड काळातील त्यांचे कार्य कदाचित सर्वांना दिसले नसेल, पण आरोग्य क्षेत्राशी संबंधित प्रत्येकाने ते जवळून अनुभवले आहे. त्या भीषण काळात अनेक राजकारणी घराबाहेर पडणे टाळत होते, मात्र प्रशांतदादा स्वतः विविध ठिकाणी फिरून परिस्थितीचा आढावा घेत होते. संकटाच्या काळात लोकांसोबत खंबीरपणे उभे राहणारा नेता काय असतो, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. सन २०१९मध्ये पनवेल उपजिल्हा रुग्णालय नुकतेच सुरू झाले होते, मात्र उपलब्ध सुविधा पुरेशा आहेत का, रुग्णांना कोणत्या अडचणी येतात आणि आणखी काय आवश्यक आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांनी पनवेलमधील काही अनुभवी डॉक्टरांसोबत अनेक पाहणी दौरे केले. त्या पाहणीदरम्यान जाणवलेल्या प्रत्येक उणिवेची नोंद घेऊन त्यांनी रुग्णालयात आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि त्या उपजिल्हा रुग्णालयाचे रूपांतर अत्याधुनिक आरोग्यसेवा देणाऱ्या रुग्णालयात केले. कोविडच्या काळात या रुग्णालयाने हजारो रुग्णांना आधार दिला आणि अनेकांचे प्राण वाचवले. आज हे रुग्णालय महाराष्ट्रातील अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालयांपैकी एक म्हणून ओळखले जाते. आजही येथे आयसीयू, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर (ओटी), डायलिसिस विभाग, सुसज्ज वॉर्ड, आधुनिक प्रयोगशाळा (लॅब), रेडिओलॉजी विभाग आणि सीटी स्कॅन सेंटर उत्कृष्टपणे कार्यरत असून हजारो नागरिक त्याचा लाभ घेत आहेत.

कोविड काळातील प्रशांतदादांच्या कार्याचे डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचारी साक्षीदार आहेत. आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी आणि रुग्णांसह कर्मचारीवर्गालाही कोणताही त्रास होऊ नये यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. अशा लोकाभिमुख कार्यामुळेच पनवेलकरांच्या मनात त्यांच्याविषयी आजही विशेष आदर आहे. कोविडच्या अभूतपूर्व संकटाच्या काळात प्रशांतदादांनी केवळ आढावा घेण्याचे काम केले नाही, तर प्रत्येक समस्येवर प्रशासनासोबत समन्वय साधून ठोस उपाययोजना राबवल्या. रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी आयुक्तांसोबत वारंवार चर्चा करून अनेक प्रश्न मार्गी लावले. ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून तहसीलदार, प्रशासन आणि स्थानिक पातळीवरील यंत्रणांशी सातत्याने संपर्क ठेवून पुरवठा सुरळीत राहील याची काळजी घेतली. रुग्णालयातील वीजपुरवठा अखंडित राहावा यासाठी महावितरण आणि संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक नियोजन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. याच काळात पनवेलवर निसर्ग आणि तौक्ते या चक्रीवादळांची संकटेही कोसळली. अशा कठीण परिस्थितीतही कोणत्याही रुग्णालयाची आरोग्यसेवा खंडित होऊ नये, रुग्णांना उपचार मिळत राहावेत आणि आपत्कालीन सेवा सुरळीत सुरू राहाव्यात, यासाठी त्यांनी स्वतः लक्ष घालून मदतकार्य उभे केले.

कोविड उपचारांमध्ये अत्यंत महत्त्वाचे ठरलेल्या रेमडेसिवीर इंजेक्शनचा तुटवडा जाणवत असताना जिल्हाधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून त्याचे योग्य नियोजन आणि उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी प्रशांतदादांनी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळू शकले. केवळ पनवेलपुरतेच नव्हे, तर महाडमध्ये भीषण पूर आला तेव्हाही प्रशांतदादा स्वतः चिखलात उतरून मदतकार्य करताना मी पाहिले आहे. संकट कोणतेही असो लोकांच्या मदतीसाठी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहणे हीच त्यांच्या कार्यपद्धतीची खरी ओळख आहे.

सन २०१९मध्ये आमच्या पारनेर तालुक्यातील गावात जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी आम्हाला मदतीची गरज होती. मी प्रशांतदादांकडे एकदाच विनंती केली आणि त्यांनी कोणताही गाजावाजा न करता संपूर्ण एक महिन्यासाठी चालक, इंधनासह जेसीबी उपलब्ध करून दिला. त्यामुळे गावातील जलसंधारणाची अनेक महत्त्वाची कामे पूर्ण करता आली. इतकेच नाही तर दादा स्वतः दोन दिवस आमच्या गावात मुक्काम करून राहिले. त्यांनी कोणत्याही लोकप्रतिनिधीसारखा औपचारिक दौरा न करता गावकऱ्यांप्रमाणे शेतात उतरून बांधबंदिस्तीच्या कामात सहभाग घेतला. त्यांच्या या साधेपणाने आणि काम करण्याच्या वृत्तीने आम्ही सर्वजण भारावून गेलो. गावाची पाहणी करताना त्यांनी शाळेलाही भेट दिली. तेथील परिस्थिती समजून घेतली आणि विकासासाठी आवश्यक असे मोलाचे सल्ले दिले. गावाजवळील धरणाची तसेच दुष्काळामुळे उभारण्यात आलेल्या जनावरांच्या छावणीची पाहणी करून तेथील नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्या समस्या त्यांनी थेट तत्कालीन मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवल्या आणि त्यानंतर गावाला आवश्यक त्या बाबींमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळाला. माझ्यासोबत त्यांनी परिसरातील आणखी दोन



गावांनाही भेटी दिल्या. तेथील परिस्थितीची पाहणी करून स्थानिक विकासकामांसाठी आर्थिक मदत (देणगी)देखील दिली. लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आपल्या मतदारसंघापुरते मर्यादित न राहता गरज जिथे असेल तिथे मदतीचा हात पुढे करणारा हा त्यांचा स्वभावच त्यांच्या कार्याची खरी ओळख करून देतो.

माझे वडील शाळेच्या कामानिमित्त मंत्रालयात वारंवार जात असत. दर पंधरा दिवसांनी त्यांना मुंबईला जावे लागायचे आणि अनेकदा अधिकाऱ्यांची वाट पाहत पाच-पाच तास मंत्रालयात थांबावे लागे. त्या वेळेत ते मंत्रालयाच्या ग्रंथालयात बसून वाचन करत असत. एकदा गप्पांच्या ओघात तेथील ग्रंथपालांनी त्यांना सांगितले, "या ग्रंथालयाचा सर्वाधिक उपयोग करणाऱ्या आमदारांपैकी एक म्हणजे प्रशांत ठाकूर. कोणत्याही विषयावर बोलताना ते सखोल अभ्यास करूनच आपले मत मांडतात." वडिलांना ही गोष्ट इतकी भावली की ते घरी आल्यावर त्यांनी मला आवर्जून सांगितली. त्या दिवसापासून माझ्या मनात प्रशांतदादांविषयीचा आदर आणखी वाढला.

प्रशांत ठाकूर हे केवळ शिस्तबद्ध आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व नाहीत, तर अनेकांसाठी प्रेरणास्थान आहेत. अत्यंत व्यस्त राजकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळूनही ते नियमित व्यायाम, योगासने आणि आरोग्यदायी जीवनशैली यासाठी वेळ काढतात. आजही या वयात ते ट्रेकिंगला जातात. त्यांच्यासोबत तिशी-पस्तिशीतील तरुण दमून जातात, पण दादा मात्र त्याच उत्साहाने डोंगर चढत राहतात. ट्रेक पूर्ण झाल्यानंतरही योगाभ्यास करण्याची त्यांची सवय त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शिस्तीची साक्ष देते. त्यांचे आहारावर असलेले नियंत्रण, नियमित व्यायाम आणि संयमी जीवनशैली हीच त्यांच्या तंदुरुस्तीची खरी गुरुकिल्ली असावी.

अनेकदा मनात प्रश्न पडतो हा माणूस झोपतो तरी कधी? सतत काम, सतत लोकांमध्ये, सतत विकासाचा ध्यास... ध्येयासाठी झपाटलेला, कर्मासाठी वाहून घेतलेला असा हा नेता! त्यांची अथक मेहनत, चेहऱ्यावरचे तेज आणि नेहमीची प्रसन्नता पाहिली की मी स्वतः त्यांच्यापेक्षा वयाने लहान असूनही कधी कधी स्वतःच्या आळशीपणाची लाज वाटते. अशी ऊर्जा, अशी कार्यतत्परता आणि अशी सकारात्मकता प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

प्रशांतदादांना साहित्य, कला आणि संस्कृती याविषयी विशेष प्रेम आहे. म्हणूनच दरवर्षी पनवेलमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या एकांकिका स्पर्धांपैकी एक स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेच्या प्रत्येक बाबीकडे त्यांचे स्वतःचे बारकाईने लक्ष असते. दरवर्षी आयोजित होणारा दिवाळी पहाट हा सांस्कृतिक कार्यक्रमही पनवेलकरांसाठी एक पर्वणीच असते. विशेष म्हणजे पहाटेच्या त्या कार्यक्रमात सर्वप्रथम उपस्थित राहणाऱ्यांमध्ये प्रशांतदादा स्वतः असतात. कला आणि कलाकारांविषयीचा त्यांचा आदर यातून दिसून येतो.

पनवेलमधील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजना यांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी प्रशांतदादांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. माझ्या अनेक परिचित रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यातही त्यांचे मोठे योगदान आहे. खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आयोजित होणारे भव्य आरोग्य तपासणी शिबिर हे हजारो गरजू नागरिकांसाठी वरदान ठरले आहे. जसा घरातील जबाबदार कर्ता पुरुष आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेत प्रतिबंधात्मक तपासण्या करून घेतो, तसेच प्रशांतदादा पनवेलमधील प्रत्येक कुटुंबाची काळजी घेत असल्याची भावना अनेकांच्या मनात आहे. म्हणूनच प्रत्येक पनवेलकर त्यांना आपल्या कुटुंबातील एक विश्वासू आणि जिव्हाळ्याचा सदस्य मानतो.

प्रशांतदादा हे केवळ एक लोकप्रतिनिधी नाहीत, तर अभ्यासू, शिस्तप्रिय, संस्कृतीप्रेमी, कलारसिक, आरोग्याबाबत जागरूक, संवेदनशील आणि जनतेच्या सुख-दुःखाशी एकरूप झालेले व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या कार्यात प्रसिद्धीपेक्षा कर्तव्याला, तर राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीत एक संदेश असतो. स्वतः नियमांचे पालन करणे, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे, नियमित व्यायाम आणि योग करणे, डॉक्टरांनी दिलेली औषधे वेळेवर घेणे, निर्व्यसनी राहणे, कुटुंबवत्सल जीवन जगणे, समाजाचे भान ठेवणे, संस्कृती आणि सभ्यता जपणे, कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला समान न्याय देण्याचा प्रयत्न करणे आणि सत्याच्या बाजूने ठामपणे उभे राहणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे सामर्थ्य आहे.

आज समाज प्रशांतदादांचे केवळ नेतृत्व स्वीकारत नाही, तर त्यांच्या जीवनशैलीचे अनुकरणही करतो. कारण आदर्श हा शब्द भाषणातून निर्माण होत नाही; तो आचरणातून घडतो आणि प्रशांतदादांचे संपूर्ण आयुष्य हे त्याचेच उदाहरण आहे.

अशा या अष्टपैलू, अभ्यासू, कर्मयोगी, जनतेच्या मनातील आणि पनवेलच्या विकासाशी समरस झालेल्या आमच्या लाडक्या प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त अनंत कोटी हार्दिक शुभेच्छा! पांडुरंगाच्या चरणी एकच प्रार्थना आपल्याला उदंड आयुष्य, निरोगी आरोग्य, अखंड ऊर्जा, सुख, समाधान, यश आणि समाजसेवेची अविरत प्रेरणा लाभो. आपण असेच जनतेच्या सेवेसाठी कार्यरत राहून पनवेलच्या प्रगतीला नवी दिशा देत राहा. वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दादा!

**-डॉ. संतोष जाधव,**
सुखम हॉस्पिटल, पनवेल

# सुसंस्कृत नेतृत्व

आमदार, खासदार वगैरे शब्द उच्चारले की आपोआप एक वलय त्यासोबत येतं, ते म्हणजे गाड्यांचा ताफा, अंगरक्षक, सहाय्यक लोकं, आजूबाजूला प्रशासकीय अधिकारी आणि कार्यकर्ते, परंतु ह्या सगळ्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पनवेल रायगडमध्ये एक नेतृत्व उभं राहिलं त्याचं नाव आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर.



मुळातच वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून जरी आमदार प्रशांत ठाकूर यांना सामाजिक आणि राजकीय वारसा मिळाला असला तरी हा नेता त्याची वेगळी छाप पाडून जातो. कुठलाही राजकीय नेता हा केवळ रस्ते, पाणी आणि वीज यापुरता मर्यादित नसतो, पण त्याने कुठल्या पातळीचं सर्वसमावेशक असावं हे प्रशांत ठाकूर यांच्याकडे बघून समजतं. यामुळेच आमदार म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्रात वेगळे उठून दिसतात.

सांस्कृतिक बैठक प्रगल्भ करणं हादेखील एक प्रकारचा आणि महत्त्वाचा विकास असतो हे आमदार प्रशांत ठाकूर यांना जितकं चांगलं समजलं आहे त्याला खरंच तोड नाही आणि याबद्दल सामान्य नागरिक ते पक्षातील अनेक श्रेष्ठींनी त्यांचं कौतुक केलं आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे ते अध्यक्ष आहेत. या संस्थेच्या नावाखाली किंवा रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ असेल वा भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ असेल या संस्थांमार्फत वर्षभर पनवेल परिसरात सांस्कृतिक कार्यक्रम होतच असतात. अनेक वेळा थेट नसली तरी या क्षेत्रात होणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांची मदत असतेच.

गेली अनेक वर्षे चालू असलेली राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा, पनवेल विधानसभा क्षेत्रात होणारे भव्य आणि श्रवणीय असे दिवाळी पहाट व संध्याचे कार्यक्रम किंवा कुठलाही नवीन सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यात आला की तो आपल्याकडे झालाच पाहिजे असा आग्रह, मराठी भाषा गौरव दिवस असो वा गुरुपौर्णिमा, कुठलाही मोठा सण-समारंभाचा दिवस, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम झालाच पाहिजे. एवढंच नाही तर कोविड काळातसुद्धा मनावर आलेल्या नैराश्याला करमणुकीची फुंकर घालत स्थानिक कलाकारांना संधी देत "मनोरंजन Unlock १ आणि २" असे कार्यक्रमसुद्धा त्यांनी घेतले.

पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे आलेला प्रत्येक कलाकार किंवा आयोजक हा एकदा येऊन थांबत नाही, त्याला मिळालेला आदर आणि प्रेम हे परत परत खेचून आणते ही वस्तुस्थिती आहे. प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने स्थानिक आणि व्यावसायिक कलाकारांना एक आधुनिक आणि अत्यंत प्रेमाचा राजाश्रय मिळाला आहे, असं ठामपणे म्हणता येईल.

एका अर्थाने पनवेल आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचं वर्षभराचं कॅलेंडर तयार असतं असंच म्हणावं लागेल. कारण वर्षभर आमदार प्रशांत ठाकूर हा सांस्कृतिक यज्ञ धगधगता ठेवतात. त्याचबरोबर इतर सगळीकडेसुद्धा कार्यक्रमांना जाणं, सण समारंभात, पाडव्याची शोभयात्रा असेल, योग दिवस असेल किंवा दिवाळी पहाट, सर्व नागरिकांबरोबर हे सण साजरे करणं यामुळेसुद्धा साहेबांचं वेगळेपण दिसून येतं.

गमतीचा भाग असा की एवढे सगळे कार्यक्रम घेणारा नेता ज्याच्यावर नागरिक आणि कलाकारांचं एवढं प्रेम आहे तो मानपानाच्या नेहमी विरोधात असतो. "माझ्यासाठी कार्यक्रम थांबवू नका", "सांस्कृतिक कार्यक्रमात उगाच राजकीय स्वागत-सत्कार नको" या त्यांच्या नेहमीच्या सूचना असतात. चार ते पाच हजारांचा प्रेक्षक दिवाळी पहाटच्या कार्यक्रमात असताना ते कार्यक्रमापेक्षा रसिकांची व्यवस्था बघत असतात. कधी वेळ मिळाला तर उशिरा कार्यक्रम बघताना आपल्या कर्मचाऱ्यांना सुट्टी देऊन कुठलाही लवाजमा न बाळगता एखाद्या कार्यकर्त्याला मित्रत्वाच्या नात्याने बाईकवर घरी सोडायला सांगतात. याच सगळ्यामुळे सामान्य कार्यकर्तासुद्धा अगदी त्यांच्या जवळचा असतो.

लोकांच्या गर्दीत ते लोकांमधलेच असतात. त्यांचा मान, प्रतिष्ठा अजिबात ते स्वतःमध्ये येऊ देत नाहीत. माझ्या नागरिकांसाठी विकासकामे करताना त्यांची सांस्कृतिक भूकसुद्धा भागली पाहिजे आणि एक सुसंस्कृत असा प्रगल्भ समाज मला घडवायचा आहे हीच त्यांची मनोमन भावना आहे आणि त्याप्रति ते अत्यंत कृतिशील आहेत.

आमदार म्हणून सामाजिक कामे, जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक वारसा, व्यवसाय या दृष्टीने पायाभूत सुविधांचा विकास आणि नाट्य परिषद तसेच सांस्कृतिक प्रकोष्ठ यांच्यामार्फत सांस्कृतिक व कला क्षेत्रात त्यांच्या नेतृत्वात उभारी घेतलेले पनवेल क्षेत्र हा सर्वार्थाने सर्वांगीण विकास घडवून आणणारे आमचे लाडके डायनॅमिक नेते आमदार प्रशांत ठाकूरसाहेब यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**-वैभव किशोर बुवा,** अध्यक्ष,
सांस्कृतिक प्रकोष्ठ, पनवेल शहर

# सर्वस्पर्शी समाजकारणी

पनवेल परिसर देशासह जगाच्या नकाशावर आला आहे. अनेक मोठमोठे प्रकल्प येथे साकारत आहेत आणि असंख्य लोक येथे वास्तव्यास येत आहेत. अशा या विभागाचे प्रतिनिधित्व आमदार प्रशांत ठाकूर हे करीत आहेत. त्यांचा वाढदिवस दरवर्षी समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होत असतो. यंदाही ही परंपरा कायम आहे.

पनवेल मतदारसंघाचे सलग चार टर्म आमदार असलेले प्रशांत ठाकूर हे केवळ राजकारणी नाहीत, तर दूरदृष्टी असलेले विकासनिष्ठ नेतृत्व आहे. राजकीय वारसा लाभलेला असूनही त्यांनी स्वबळावर आपली ओळख निर्माण केली. त्यांच्या वडिलांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांनी समाजकारणात ठसा उमटवला आणि मुलाने तोच वारसा आधुनिक युगाशी जुळवून पुढे नेला.

पनवेलचे नगराध्यक्ष ते आमदार हा प्रवास करत असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनमानसात राहून प्रचंड कामे केली. त्यांनी केलेले कार्य पाहून रायगड जिल्ह्यातील युवकांचे ते प्रेरणास्थान बनले. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे संयम, विचारशीलता आणि कर्तृत्व यांचा त्रिसूत्री संयोग. लोकांशी थेट संवाद, भूमिपुत्रांसारखा आपलेपणा, विकासाची दूरदृष्टी आणि निर्णयक्षमतेची ताकद यामुळे पनवेलच्या जनतेच्या मनात त्यांनी आपले अढळ स्थान निर्माण केले.

रायगड जिल्ह्यातील एक कर्तृत्वान लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपली ओळख आज संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केली आहे. सर्वच क्षेत्रांत त्यांचे काम असून एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्याकडे आज समाजात पाहिले जात आहे. आमदार म्हणून काम करताना लोकप्रतिनिधी नात्याने विधिमंडळात आवाज उठवून विविध प्रश्न, समस्या अभ्यासपूर्ण मांडून प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण सुंदर असा विकास साधला आहे. एक उत्तम वक्ता म्हणून त्यांची ख्याती असून ते एक तरुण नेतृत्व असल्याने तरुणांबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना आहे. रायगडातील तरुणांना संघटित करून त्यांनी जिल्ह्यात भाजप पक्षाची संघटना उभी केली आहे. आपल्याकडे आलेल्या लोकांची कामे झाली पाहिजेत, त्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत या उदात्त भावनेतून ते काम करीत आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या बोलण्यात नेहमी उल्लेख असतो की आपली संस्कृती हीच आपल्या समाजाची ओळख आहे. ती रुजवणं, वाचवणं म्हणजे आपल्या मुळांशी प्रामाणिक राहणं गरजेचे आहे. त्यांच्या नेतृत्वात पनवेल आणि परिसरात अनेक कला, सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळाली आहे. राजकीयदृष्ट्या जबाबदारी सांभाळत असताना आमदार प्रशांत ठाकूर रंगभूमीवरील नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठीदेखील प्रयत्नशील असतात. त्यांचे कार्यालय केवळ राजकीय चर्चांसाठीच नव्हे; तर कलाकारांच्या समस्या, प्रश्न, नवनवीन उपक्रमांच्या सादरीकरणासाठीही खुले असते. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणं, लोककलांचे जतन, शाळा-कॉलेजमध्ये कला शिक्षण अनिवार्य करणं आणि सातत्याने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणं यांसारख्या अनेक बाबींचा उल्लेख करता येईल. त्यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या अनेक उपक्रमांमध्ये दरवर्षी नवनवीन कलावंत



जोडले जात आहेत आणि उपक्रमांची नावं घ्यावी तितकी कमी पडतील.

आज ज्या वेगाने जग पुढे जात आहे, तिथे विकास म्हणजे फक्त रस्ते, पूल, स्मार्ट सिटी, उद्योग यापुरताच मर्यादित राहिलेला नाही. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जो आपल्या सांस्कृतिक मुळांशी नातं तोडत नाही आणि हीच जाण ठेवून प्रशांतदादा कार्य करीत आहेत. ते आपल्या राजकीय कार्यात सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासोबतच सांस्कृतिक क्षेत्रालाही केंद्रस्थानी ठेवतात हे विशेषत्वाने जाणवते. अशा या जनतेशी नाळ जुळलेल्या लोकप्रतिनिधीला वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**(संकलन : रामप्रहर)**

## माणसातला देव

देव कधी मी नाही पाहिला
माणसातला देव मात्र मला जाणवला
त्याच माणसाची मांडते कथा
ज्याचे आयुष्य एक यशोगाथा
दुसऱ्याच्या वेदना अन् चिंतेची टोपली
त्यांनी आपल्या सक्षम हातांनी उतरवली
असतो समाजाच्या भल्याचाच ध्यास
कष्टकरी हाताला दिला मेहनतीचा घास
वाहिली घरोघरी गंगा ज्ञानाची
शान वाढली पनवेल तालुक्याची
मानवतेचं धगधगतं कुंड पेटत राहो
सुयश सदैव त्यांच्यासाठीच वाहो
लेखणी नेहमी तोकडी पडते माझी
प्रशांत सरांची महती आहेच तशी
जन्म त्यांचा समर्पणाचा दीर्घायुषी होवो
नित्य नवं सूर्यासम तेज त्यांचे राहो
नित्य नवं सूर्यासम तेज त्यांचे राहो...

**-दीपाली कुलकर्णी, शिक्षिका,**
लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम
स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे


माननीय आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !
R Jhunjhunwala
Sankara Eye Hospital
स्पेशालिटी सेवा
मोतिबिंदू
बाल नेत्ररोग आणि स्ट्रॅबिसमस
काचबिंदू
ऑरबिट आणि ऑक्यूलोप्लास्टी
विट्रियो रेटिना सेवा
ऑक्यूलर डायग्नोस्टिक सेवा
कॉरनिया आणि केराटोप्लास्टी
व्हिजन थेरपी क्लिनीक
सदैव आपल्या सेवेत उपलब्ध
सोमवार ते शनिवार : स.९.०० ते रा. ८.०० पर्यंत | रविवार व सुट्टी स.९.०० ते संध्या ६.०० पर्यंत
सामाजिक प्रभावासह जागतिक दर्जाची डोळ्यांची काळजी.
सर्व प्रमुख विमा कंपन्यांसाठी कॅशलेस सेवा उपलब्ध आहे.
आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
* नियम व अटी लागू
आर. जे. शंकरा आय हॉस्पिटल
प्लॉट नंबर १३, सेक्टर ५-अ, नविन पनवेल (पुर्व), नवी मुंबई, महाराष्ट्र: ४१०२०६
022-27484300 | 7738 7739 14


PRACHIN HEALTHCARE
MULTI-SPECIALITY HOSPITAL
"NEW STEPS FOR EVERY GENERATIONS
PIONEERING THE NEXT
ERA OF CARE"
PRACHIN Healthcare
Best wishes on your Birthday.
Wishing you another year of great accomplishments!
Happy Birthday,
Shree. Prashantji Thakur (MLA - Panvel)
PRACHIN EMBRION IVF CENTER
Dr. Sangeeta M. Dake.
M.D.D.G.O. ( Sion Hospital )
IVF Specialist
JOINT REPLACEMENT CENTER
Dr. Mangesh R. Dake.
MS - Orthopaedics ( K E M Hospital )
( Arthroscopic , Trauma &
Joint Replacement Surgeon )
Address
Plot No.69/2, Behind Hotel Garden, HOC Colony, Panvel - 410206
CONTACT NO. +91 22 71333258 / 59 | EMERGENCY. +91 96191 83258
Web : prachinhealthcare.com | Email : info@prachealthcare.com


संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना
नव्या दिशा..
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुमचे
ह्याच वाढदिवसाच्या
शुभेच्छा..!
5 ऑगस्ट
मा. श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !
UROLOGY CENTER
लाईफ लाईन हॉस्पिटल
JOINT REPLACEMENT CENTRE
शुभेच्छुक
डॉ. प्रकाश पाटील (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक)
डॉ. जयश्री पाटील (वैद्यकीय संचालिका)
डॉ. अभितेज म्हस्के (संचालक)
डॉ. केतकी म्हस्के (पाटील) (संचालिका)
डॉ. अजिंक्य पाटील (संचालक)
डॉ. जान्हवी पाटील (वैद्यकीय संचालिका)
श्री. पराग बेडसे (संचालक)
आणि लाईफलाईन हॉस्पिटल कर्मचारी वृंद


कार्यसम्राट
मा.श्री. आमदार
प्रशांत ठाकूर
साहेब आपणांस
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
PRAJAPATI MAGNUM
Limited Inventory Remaining
OC Received
SPACIOUS 2 BHK APARTMENTS
₹ 94 LACS* ONWARDS
DRONAGIRI | 8080 504 056 | Maha RERA Registration No. P52000001121 | P52000001425


मा. आमदार श्री. प्रशांतजी ठाकूर यांना
पितांबरीतर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा!
पितांबरी® टूर्स आणि ट्रॅव्हल्स
जगभर फिरा, आपुलकी अनुभवा
Monsoon
स्पेशल टूर्स!
३१ ऑगस्टपूर्वी बुकिंगवर मिळवा ₹ १५०० ते ४००० पर्यंत सूट!*
दापोली रिसॉर्ट
२ रात्री / ३ दिवस व ३ रात्री / ४ दिवस
राजापूर रिसॉर्ट
३ रात्री / ४ दिवस
Scan for a quick tour of Pitambari Resorts
बैलगाडीची रपेट
रुचियाना रेस्टॉरंट
आयुर्वेद उद्यान
हॉर्नबिल पाहण्याची पर्वणी
प्रशस्त कॉटेजेस
स्विमिंग पूल
Scan for Upcoming Tour Dates
देश-विदेशातील आकर्षक टूर्स!
राजस्थान- मेवाड
राजस्थान- मारवाड
संपूर्ण राजस्थान
केरळ
उत्तर प्रदेश
कोस्टल कर्नाटक
हंपी बदामी
नेपाळ
स्टॅच्यू ऑफ युनिटी आणि बडोदरा
महाबळेश्वर आणि वाई
श्री समर्थ रामदास स्थापित ११ मारुती दर्शन
कास पठार
टूरमध्ये समाविष्ट
एसी गाडीतून प्रवास आणि पर्यटन स्थळांची सफर
प्रिमियम एसी स्टे
जेवणाची उत्तम सोय
अष्टविनायक दर्शन
श्री मयूरेश्वर
श्री सिद्धिविनायक
श्री बल्लाळेश्वर
श्री वरदविनायक
श्री चिंतामणी
श्री गिरीजात्मज
श्री विघ्नेश्वर
श्री महागणपती
*DISCOUNT ONLY APPLICABLE ON TOUR PRICES ABOVE ₹ 35,000/-
बुकिंग व अधिक माहितीसाठी संपर्क:
Mumbai: 9240244757, 9240203143, 8828913131, 9867181020
Visit our website: https://tours.pitambari.com/
पितांबरी टूर गाईड नेहमी तुमच्या सोबत.


5 ऑगस्ट
संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा,
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे ह्याच
वाढदिवसाच्या शुभेच्छा..!
जनतेचे आमदार
मा.श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
tpv
Cement & other construction materials
TPV SALES LTD.
FORMERLY THAKKAR POPATLAL VELJI SALES LTD.
+91 9833367777 / 022-27453346 www.tpvindia.com
Tulsi Pooja, Office no.2, 1st floor, Sector - 1,
Plot 5 & 7, New Panvel (E) 410206, Maharashtra, India.


Happy Birthday,
Shree. Prashantji Thakur (MLA - Panvel)
Rupay Select Credit Card
Get ready to immerse yourself in a world full of rewards!
Branches can apply through CAPS/E-Platform
BOI
6528 6701 2345 6789
07/26
CARDHOLDER NAME
RuPay CREDIT
OFFERS AVAILABLE
ENTERTAINMENT
INR 250 off on purchase of min 2 tickets per month from Book My Show
Complimentary Annual Membership of Amazon Prime
HEALTH CHECK-UP
Annual membership of customised packages which can be used once per annum
GROCERIES
INR 200 discount voucher per month on Big Basket
LOUNGE ACCESS
8 Domestic & 2 International Lounge Access per annum
DINING
3-month membership per annum of Swiggy One offering free deliveries and additional discounts
INSURANCE
Upto INR 10 Lakhs Cover of Personal Accident & Permanent Disability
LOYALTY REWARDS
2x Loyalty Rewards
CONCIERGE SERVICES
24x7 Domestic & International Concierge Services available
Activation of Credit Card
Credit Card PIN can be generated through
Loyalty Rewards
No Issuance Charges
Scan here
To apply for credit card
Eligibility for Rupay Select Credit Card
To apply for a Rupay Select Credit Card, customers should fulfil the following criteria:
A minimum age of 18 years
An Indian resident or a Non-resident India (NRI)
A regular income proof. The customer can either be a salaried employee, or self-employed and managing his own business
A good credit history
Bank of India
Relationship beyond banking


अवघी सारी जनता जाणते तुमच्या
कर्तृत्वाची चाहूल, पनवेलच्या प्रगतीच्या
दिशेने पडलेले तुमचे प्रत्येक पाऊल..!
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स
कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष
मा.श्री. आमदार
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
Ramsheth Thakur International Sports Complex
RTISC
शुभेच्छुक
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स
व संचालक मंडळ, उलवे नोड, नवी मुंबई.
मा. श्री. परेश रामशेठ ठाकूर
(चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर)
मा. श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
(जनरल सेक्रेटरी)
सदस्य : श्री. रविंद्र बाळकृष्ण भगत, श्री. भार्गव रामदास ठाकूर, श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर, श्री. शिव शंकर सुमन, श्री. स्वप्निल अरुण ठाकूर, श्री. प्रतिक भरत ठाकूर, श्री. अभिजित उत्तमराव जाधव, श्री. अमोल यशवंत देशमुख, श्री. भुषण श्रीधर ठाकूर








कर्तव्यदक्ष आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

OAK Clinic + PathLab
Care. Precision. Expertise.
सर्जन | मनोविकार तज्ञ | त्वचारोग तज्ञ | पॅथॉलॉजिस्ट

WITH BEST COMPLIMENTS

Dr. Aditya C. Oak
M.B.B.S | Ms (General Surgery) FMAS
General Surgery | Laproscopic Surgery|
Breast Surgery | Endoscopy | Anorectal Surgery
Thyroid Surgery

Dr. Sanjiv S. Kale
M.B.B.S | M.D (Psychiatry)
Consultant Psychiatrist

Dr. Maya S. Kale
M.B.B.S | DVD (Skin, Hair & Nail)
Consultant Dermatologist

Dr. Kavita Kale Oak
M.B.B.S | M.D (Pathology)
Consultant Pathologist

Timing : 7.00 AM to 9.00 PM
For Appointments 7045 585 585
oakclinicandlab.com

Oak Clinic and Path Lab
Office No 111-112, 101-103 1st Floor,
Shraddha Society, Chhatrapati Shivaji Maharaj Chowk,
Panvel, Maharashtra 410206












WITH BEST COMPLIMENTS FROM
MANYATA
OM SAI HOSPITAL
COMPLETE HEALTHCARE SOLUTION
FIRST FLOOR, JALARAM LANDMARK, PLOT NO 6, SECTOR 11, KAMOTHE.
Phone No.: 9323012909

Dr. Chetan Chhajed
M.B.B.S., D.Ortho.
Consulting Orthopaedic,
Trauma & Spine Surgeon
Mob : 9619905156

Dr. Santosh Jaybhaye
M.B.B.S; D.G.O.; F.C.P.S.; PGDMLS
Dip.Gyn.Endoscopy ( Germany)
Consultant Obstetrician and Gynaecologist
Infertility Consultant
Consultant Gynaec. Endoscopic Surgeon
Mob : 9819294537

Dr. Shweta Chhajed
M.B.B.S., D.O.M.S., F.R.S.
Consultant Ophthalmologist
(Eye Surgeon)
Mob.: 9833150759

Dr. Manju S. Jaybhaye
M.B.B.S., D.C.H.
Consultant Pediatrician &
Neonatologist
(बालरोग व नवजात शिशु तज्ञ)
Mob : 9819380199


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगु ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन होणार; सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील वाढती पाणीटंचाई दूर करण्यासाठी आणि प्रदूषित नद्यांना संजीवनी देण्यासाठी फडणवीस सरकारने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्य सरकारतर्फे 'महाराष्ट्र राज्य पुनरुज्जीवन परिषद' या विशेष कंपनीची स्थापना केली जाणार असून पहिल्या टप्प्यात या बृहत् प्रकल्पासाठी सुमारे चार हजार कोटी रुपयांचा निधी उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमुळे राज्यातील विविध भागांत होणारी पाण्यासाठीची भटकंती आणि टंचाई रोखण्यास मोठी मदत होणार आहे.

प्रस्तावित महाराष्ट्र राज्य पुनरुज्जीवन परिषदेच्या अध्यक्षपदी स्वतः मुख्यमंत्री असणार आहेत, तर राज्याचे पर्यावरणमंत्री या परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. नदी पुनरुज्जीवनाच्या प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी उभारताना जागतिक बँकेसह इतर विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय वित्तीय संस्थांची मदत घेण्याचा राज्य सरकारचा मानस आहे.

## विमानाला हादरे; प्रवासी जखमी

**मुंबई :** एअर इंडियाच्या थायलंड (फुकेट)-दिल्ली फ्लाइट विमानाला मंगळवारी (दि.४) सकाळी अपघात झाला. दिल्ली विमानतळावर उतरत असताना उंची अचानक कमी झाल्याने विमानाला हादरे बसले. यात विमानातील काही प्रवासी आणि कर्मचारी जखमी झाले असून विमानाच्या छताला तडे गेल्याचे फोटो व्हायरल झाले आहेत. एअर इंडियानेही त्यास दुजोरा दिला आहे.

## अमोल महाजन यांनी स्वीकारला सहाय्यक संचालकपदाचा कार्यभार



**नवी मुंबई : बातमीदार**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अमोल महाजन यांनी मंगळवारी (दि.४) विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथील सहाय्यक संचालक (माहिती) या पदाचा कार्यभार स्वीकारला. संजीवनी जाधव यांच्या बदलीनंतर पद हे रिक्त होते.

कोकण विभागातील शासकीय जनसंपर्क, माहिती प्रसारण आणि प्रसारमाध्यमांशी समन्वय साधण्याची मुख्य जबाबदारी आता महाजन यांच्याकडे असणार आहे. या मुख्य पदासोबतच त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग येथील माहिती अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभारही स्वीकारून आपल्या नवीन प्रशासकीय टप्प्याची सुरुवात केली आहे. यापूर्वी त्यांनी विविध ठिकाणी काम केलेले आहे.










# सुधागड कामतेकरवाडी शाळेतील ६६ विद्यार्थी महिनाभरापासून शिक्षकाविना!

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याच्या दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कामतेकरवाडी येथे मागील एका महिन्यापासून ६६ आदिवासी विद्यार्थी शिक्षकाविना ज्ञानार्जनापासून वंचित आहेत.

या पार्श्वभूमीवर, बहुजन विद्यार्थी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड व माजी तालुका अध्यक्ष राहुल कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज सुधागड पंचायत समितीचे गटशिक्षण



अधिकारी सादुराम बांगारे आणि पंचायत समिती सभापती जागृती मानकर यांना सविस्तर निवेदन दिले. या निवेदनात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान त्वरित थांबवण्यासाठी दोन दिवसांत शाळेत शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

खांडपोली येथील कामतेकरवाडी जिल्हा परिषद शाळा ही परिसरातील आदिवासी समुदायासाठी शिक्षणाची महत्त्वाचे केंद्र आहे. ६६ आदिवासी विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. मात्र, गेल्या महिन्याभरापासून येथे एकही शिक्षक उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. पालक आणि स्थानिक ग्रामस्थांनी या संदर्भात वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केला, परंतु त्यांना ठोस आश्वासन मिळाले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर शाळेतील शिक्षकाची बदली झाली असून, त्यांच्या जागी अद्याप नवीन शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही. प्रशासकीय दिरंगाईमुळे ही परिस्थिती ओढवल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आदिवासी बांधवांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार योजना राबवत असल्याचा दावा करते, मात्र प्रत्यक्षात प्रशासकीय पातळीवर अशी अनास्था दिसत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. यासंदर्भात सभापती जागृती मानकर यांनी सांगितले की आम्ही लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करू.

# बोर्ली पंचतन येथील आरोग्य सहाय्यकाला लाच घेताना अटक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक घनश्याम कोमटवार (वय २२) यास अलिबाग येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी पाच हजार रुपयाची लाज घेताना रंगेहात अटक केली आहे. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



या घटनेतील तक्रारदाराला तू बोगस डॉक्टर आहेस. दहा हजार रुपये दे, नाहीतर तुझ्यावरती धाड टाकीन, अशी धमकी देऊन लाचेची मागणी करण्यात आली होती. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सदर लाच स्वीकारत असल्याची पडताळणी केल्यानंतर सदरची कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गर्दी असल्यामुळे तक्रारदाराने आरोपीला प्राथमिक आरोग्य केंद्रा समोरील रस्त्यावर बोलवून घेतले व त्या ठिकाणी पाच हजार रुपयाची लाच स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने घनश्याम कोमटवार याला अटक केली. आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्या हाताला व जीन्स पॅन्टच्या खिशाला अँथॉसिन पावडर आढळून आली आहे.

बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये घनश्याम कोमटवार हा आरोग्य सहाय्यक या तृतीय श्रेणी पदावरती कार्यरत आहे. तृतीय श्रेणी कर्मचाऱ्याला अशा प्रकारे लाच घेताना पकडले गेल्यामुळे यामागे कोणी डॉक्टरांचा हात आहे का? याची देखील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी करण्याची आवश्यकता आहे. रात्री उशीरापर्यंत दिघी सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी खोपोली दौऱ्यावर ; सावळेंकडून स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी हे मंगळवारी (दि.४) खोपोली दौऱ्यावर आले होते. हर घर तिरंगा या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली

यावेळी त्यांनी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या नगरपालिकेतील दालनात जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेतली, यावेळी विक्रम साबळे यांनी अविनाश कोळी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सुमारे अर्धा तास त्यांनी हर घर तिरंगा या कार्यक्रमाच्या संबंधी चर्चा केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या समवेत युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, खोपोली भाजप अध्यक्ष अजय इंगुलकर सरचिटणीस विकास खुरपडे, महिला मोर्चा अध्यक्षा व नगरसेविका अश्विनी अत्रे, परिवहन सभापती किशोर पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.



## वडघरच्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात 'वर्षारंग'सह भात लावणीचा आनंद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील वडघर येथे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकातर्फे १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला 'वर्षारंग' हा आगळावेगळा पावसाळी उपक्रम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या 'जेन झी'च्या उत्स्फूर्त सहभागाने आनंदात पार पडला.



'वर्षारंग'च्या पहिल्या टप्प्याची सुरुवात 'साने गुरुजी जीवनदर्शनी'ने झाली. या जीवनदर्शनीतून सहभागींना साने गुरुजींचे जीवनकार्य, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान तसेच 'जगाला प्रेम अर्पावे' हा त्यांचा मानवतावादी संदेश उलगडून दाखविण्यात आला. गुरुजींच्या विचारांची, मूल्यांची आणि जीवनदृष्टीची प्रेरणादायी ओळख करून देत उपक्रमाची सुरुवात अर्थपूर्ण वातावरणात झाली.

कोकणातील गुडघाभर चिखलात होणाऱ्या पारंपरिक भातलावणीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि कोकणातून सहभागी स्मारकात दाखल झाले होते. विशेष म्हणजे, अवघ्या तीन वर्षांच्या बालकांपासून ते ८३ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील निसर्गप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेतला. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात तरुणाईचा वावर कायमच असतो. सध्या देशभर चर्चेत असलेल्या 'जेन झी' पिढीचाही 'वर्षारंग'मध्ये उत्स्फूर्त सहभाग होता. त्यांच्या सळसळत्या ऊर्जा, श्रमसंस्कार स्वीकारण्याची तयारी आणि प्रत्येक उपक्रमातील सक्रिय सहभागामुळे संपूर्ण शिबिराला एक वेगळेच चैतन्य लाभले.

'वर्षारंग'मधील भातलावणी हा केवळ एक अनुभव नसून अन्नदाता शेतकरी आणि कृषिकर्मी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक संस्कार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सहभागींनी पारंपरिक पद्धतीने भातलावणी करत श्रमसंस्कार, शेतीसंस्कृती आणि निसर्गाशी असलेले आपले नाते प्रत्यक्ष अनुभवले.भातलावणी बरोबरच रानभाज्यांच्या आस्वादाने परिपूर्ण भोजन, पावसाळी कविता-गाणी, चिखलातील खेळ आणि गप्पा-टप्पा यांमुळे उपक्रमाला अधिक रंगत आली.

पर्यावरण अभ्यासक मल्हार इंदुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्मारक परिसरात निसर्गभ्रमंती आयोजित करण्यात आली. या भ्रमंतीत सहभागींना परिसरातील जैवविविधता, विविध वनस्पती, पक्षी आणि स्थानिक पर्यावरणीय वैशिष्ट्यांची माहिती देण्यात आली. निसर्गाशी नाते दृढ करणे आणि जैवविविधता संवर्धनाविषयी जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खोपोलीत उपक्रम

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे आमदार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश चिटणीस प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त, भाजपा रायगड युवा मोर्चाच्या वतीने एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या शुभप्रसंगी 'डॉ.कुंदा आणि सुभाष दोंदे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सुभाष महादेव दोंदे मेमोरियल दिव्यांग मुलांची कार्यशाळा वरची खोपोली येथील दिव्यांगत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.या सेवाकार्याला सर्वांनी दुपारी ठीक १२.वाजता भाजप खोपोली शहर मंडळ अध्यक्ष, सरचिटणीस, सर्व नगरसेवक व नगरसेविका, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष व सर्व पदाधिकारी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन खोपोली नगर परिषद उपनगराध्यक्ष व भाजप रायगड जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष विक्रम यशवंत साबळे यांनी केले आहे.

## ‘आत्मा’ अंतर्गत मुरुड तालुक्यातील २५ शेतकऱ्यांना मत्स्यबीजांचे वितरण

**मुरुड : प्रतिनिधी**

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कृषी संलग्न प्रात्यक्षिक कार्यक्रमाअंतर्गत मुरुड तालुक्यातील २५ शेतकऱ्यांना रोहु, कटला व सायप्रिन या जातींच्या मत्स्यबीजांचे वितरण रायगड जि प. सदस्या ज्योती नागावकर यांच्या हस्ते करण्यात आले.प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यास एक हंडी या प्रमाणे मत्स्यबीजांचे वाटप करण्यात आले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे , कृषी सेवक प्रदीप मालचे, माजी सभापती रमेश नागावकर तसेच तालुक्यातील लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागावकर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की,मत्स्यपालनामुळे शेतीबरोबरच अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध उपलब्ध व्हावा तसेच कृषी व मत्स्यपालन यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत व्हावी आणिग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण व्हावी हा शासनाचा उद्देश असल्याचे सांगितले .

शेतकऱ्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्यपालन करून शेततळे, सिंचन तलाव व इतर जलस्त्रोतांचा प्रभावी वापर करावा असे सांगुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन मत्स्यपालन व्यवसायाचा विस्तार करण्याचे आवाहन कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी केले .कार्यक्रमाचे नियोजन व लाभार्थी शेतकऱ्यांना मत्स्यबीजांचे वितरण कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या माध्यमातून यशस्वीरीत्या करण्यात आले.या उपक्रमामुळे मुरुड तालुक्यात मत्स्यपालन व्यवसायाला चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास लाभार्थ्यांनी व्यक्त केला.



## जोरदार पावसामुळे मिनी ट्रेनचे नेरळ रेल्वेस्थानक पाण्याखाली

**नेरळ : प्रतिनिधी**

गेल्या ४८ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कर्जत तालुक्यात अक्षरशः हाहाकार माजवला आहे. नद्या, नाले आणि धबधबे दुथडी भरून वाहत असून नेरळ येथील माथेरान मिनीट्रेन स्थानक पूर्णतः पाण्याखाली गेल्याने परिसराला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. स्थानकातील रेल्वे रुळ, प्लॅटफॉर्म आणि शेडखाली उभे असलेले मिनी ट्रेनचे डबेही पाण्यात अडकले होते.

स्थानकाच्या परिसरातून जाणाऱ्या नैसर्गिक नाल्याची वाट अडवल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. पावसाचा जोर आणखी काही काळ कायम राहिला असता, हे पाणी उलटून मध्य रेल्वेच्या मुंबई कर्जत या मुख्य मार्गावरील रेल्वे रुळांवर गेले असते आणि मध्य रेल्वेची वाहतूकही विस्कळीत होण्याची शक्यता होती.

सकाळपासून संततधार पाऊस सुरू असताना दुपारनंतर पावसाचा जोर काहीसा कमी झाला. त्याचवेळी रेल्वे कर्मचाऱ्यांनी पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गातील कचरा हटवून अडथळे दूर केले. त्यामुळे साचलेले पाणी हळूहळू ओसरू लागले आणि परिस्थिती काही प्रमाणात नियंत्रणात आली.

दरम्यान, मध्य रेल्वेच्या नियोजनशून्य कामामुळे नैसर्गिक नाल्याची वाट बंद झाल्याने या परिसरात प्रत्येक पावसाळ्यात पाणी साचून नदीसारखी परिस्थिती निर्माण होत असल्याची टीका स्थानिक नागरिक करत आहेत. मान्सून काळात माथेरान मिनी ट्रेन सेवा बंद असली तरी पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना नेरळ स्थानकातून पुढील प्रवासासाठी मिनी ट्रेन स्थानक परिसरातून जावे लागते. आज दिवसभर साचलेल्या पाण्यामुळे नागरिक आणि पर्यटकांची मोठी गैरसोय झाली. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



# श्रीवर्धन मठाच्या स्मशानभूमीजवळील दशक्रिया विधी शेडचे काम दीड वर्षापासून अर्धवट

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमी जवळ असलेल्या अवधूत मंदिरासमोर प्राप्त झालेल्या निधीमधून ठेकेदाराने शेडचा पाया व पिलर उभे केले आहेत. परंतु पुढील निधीची तरतूद नसल्यामुळे वरील स्लॅबचे काम व भिंती यांचे काम अडून राहिले आहे. त्यामुळे सर्व हिंदू समाजाच्या नागरिकांना दशक्रिया विधी करण्यासाठी उघड्यावर बसावे लागते. पावसाळ्यात पाऊस सुरू असल्यानंतर हा विधी करण्यासाठी नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.



श्रीवर्धन नगरपरिषदेने या ठिकाणी असलेल्या अवधूत मंदिराजवळ दशक्रिया विधी करण्यासाठी शेडचे बांधकाम हाती घेतले होते. सुरुवातीला या शेड साठी कमी प्रमाणात निधी उपलब्ध असल्याने या ठिकाणी पत्र्याच्या शेडचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु सदरचा परिसर हा समुद्रकिनाऱ्याजवळ असल्यामुळे या ठिकाणी वाऱ्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात असते. पावसाळ्यात तर प्रचंड वेगाने वारे वाहत असतात. तर एखाद्या वेळेस चक्रीवादळ झाल्यास देखील या शेडला नुकसान पोहोचण्याची शक्यता होती. त्यामुळे नागरिकांनी या ठिकाणी आरसीसी शेड उभारावी अशी मागणी केल्यानंतर प्राप्त असलेल्या निधीमधून सदर ठेकेदाराने शेडचा पाया व पिलर उभे केले आहेत. परंतु पुढील निधीची तरतूद नसल्यामुळे वरील स्लॅबचे काम व भिंती यांचे काम अडून राहिले आहे. श्रीवर्धन शहराला लागूनच असलेली आराठी ग्रामपंचायत हद्दीमधील हिंदू समाजाचे सर्व अंत्यविधी व दशक्रिया विधी या ठिकाणीच करण्यात येतात. तसेच श्रीवर्धन शहरातील बहुतांश परिसरातील नागरिकांचे अंत्यविधी व दशक्रिया विधी याच ठिकाणी केले जातात.

सदर अवधूत मंदिराजवळ एक विहीरदेखील आहे. परंतु या विहिरीची नियमित स्वच्छता होत नसल्यामुळे विहिरीचे पाणी खराब झालेले पाहायला मिळते. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने व श्रीवर्धनच्या आमदार, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## तळोजात लॉजवर छापा ; युगुल जेरबंद, २९ ग्रॅम गांजासह १.०२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने तळोजा परिसरातील ओम साई रेसिडेन्सी लॉजवर धडक कारवाई करत अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असल्याच्या संशयावरून एका युगुलाला अटक केली. या कारवाईत २९ ग्रॅम गांजा, चार मोबाईल फोन असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून यामुळे खळबळ उडाली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान संशयितांकडून गांजा जप्त करण्यात आला. त्यानंतर दोघांविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस) गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेली महिला मूळची पंजाब येथील असल्याचे समोर आले आहे. पंजाबमधून नवी मुंबईत गांजाची वाहतूक करणाऱ्या साखळीशी तिचा संबंध असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणामागे आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीचे जाळे कार्यरत असल्याची शक्यता गृहीत धरून तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

या रॅकेटशी संबंधित इतर संशयितांचा शोध सुरू असून, अमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करण्यासाठी अमली पदार्थविरोधी पथक सखोल तपास करत आहे.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पनवेलमध्ये बैठक

# महापौरांच्या अध्यक्षतेखाली आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सव पर्यावरणपूरक, न्यायालयीन निर्देशांनुसार आणि नागरिकांच्या दृष्टीने सुरक्षित व सुव्यवस्थित पद्धतीने साजरा व्हावा, या उद्देशाने सोमवारी (दि. ३) पनवेल महानगरपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मूर्तिकार, मूर्ती विक्रेते तसेच अशासकीय संस्था, सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती अध्यक्ष बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे तसेच प्रशासनाच्या वतीने पर्यावरण विभागाचे उपआयुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, विभाग प्रमुख मनोज चव्हाण, पर्यावरण विभगाचे प्रवीण व्हळगल यांच्यासह पनवेल महापालिका क्षेत्रातील मूर्तिकार, मूर्ती विक्रेते, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था व पर्यावरण क्षेत्रात कार्यरत विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत पर्यावरण विभागाचे उपआयुक्त स्वरूप खारगे यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ९६/२०२४ मधील न्यायालयीन आदेश तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या गणेशोत्सवसंदर्भातील शासन निर्णयामधील महत्त्वपूर्ण निर्देशांची माहिती उपस्थितांना दिली. यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तींच्या विसर्जनाबाबत लागू असलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

या बैठकीत प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार करण्यात आलेल्या घरगुती गणेशमूर्ती तसेच सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या सर्व पीओपी मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावामध्येच करण्यात यावे. पीओपी मूर्तींचे उत्पादक व विक्रेते यांनी प्रत्येक मूर्तीच्या मागील बाजूस स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ऑईल पेंटने लाल रंगाचे गोल चिन्ह करणे बंधनकारक असून त्यामुळे ग्राहकांना मूर्तीचा प्रकार सहज ओळखता येईल. पीओपी मूर्ती विक्री करताना संबंधित ग्राहकांना विसर्जनासंदर्भातील आवश्यक माहिती देण्यात यावी व शासन निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. यावेळी पनवेल महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत "उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा" संकल्पनेंतर्गत पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्तींना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या गणेशोत्सव स्पर्धेबाबत माहितीही देण्यात आली.

# नवी मुंबईमधील अतिधोकादायक इमारतींची पाणी-ड्रेनेज लाइन खंडित

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये अतिधोकादायक सी १ प्रवर्गातील इमारतींमध्ये पावसाळी कालावधीत कोणतीही दुर्घटना घडू नये यादृष्टीने काळजी घेत या इमारतींमधील रहिवास थांबवावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले होते.



मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांनी परिमंडळ १चे उपायुक्त डॉ. अमोल पालवे व परिमंडळ २चे उपायुक्त संजय शिंदे आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत सोमवारी नवी मुंबई महपालिका क्षेत्रातील सी १ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तेथील रहिवास थांबावा याकरिता त्या इमारतींची नळजोडणी व मलनिःसारण वाहिनी खंडित करण्यात आली.

बेलापूरमधील १. व्हाईट हाऊस सोसायटी लि, सेक्टर-२१, नेरुळ, नेरूळमधील १. शिवनेरी सोसायटी बिल्डींग नं.१,२ & ३, प्लॉट नं.१, सेक्टर-३, नेरुळ, वाशी विभागातील १. लिटिल फ्लॉवर सो. लि जेएन-४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से.९ वाशी, २. नूर को ऑप हो सो लि, प्लॉट नं १८, सेक्टर-०९ ऐ, वाशी, ३. सी १ व सी २ टाईप, बिल्डींग नं-१ ते १२, सेक्टर-०२, वाशी, ४. सुमंगल अपार्टमेट, बी-३, सेक्टर-३, वाशी, कोपरखैरणे विभागातील १. गगनगिरी सोसायटी, कंडोनियम क्र.०२, सी टाईप, इमारत क्र.१ ते १३, सेक्टर ९, कोपरखैरणे, २. सिल्व्हर नेस्ट सोसायटी, भू.क्र.८९, से.१५, कोपरखैरणे, ३. राज पॅलेस सोसा. लि.प्लॉट नं.१६, सेक्टर-२, कोपरखैरणे या इमारतींची नळजोडणी व मलनिःसारण वाहिन्या खंडित करण्यात आल्या.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त संगीत विद्यार्थ्यांसाठी

# विदुषी शुभदा पराडकर यांचे विशेष मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी एक विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गायिका व विदुषी शुभदा पराडकर या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. हा मार्गदर्शनपर कार्यक्रम बुधवारी (दि. ५) दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत पनवेलमधील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला असून प्रवेश विनामूल्य आहे.



संगीत क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्या तसेच शास्त्रीय संगीत, ठुमरी, दादरा, टप्पा आणि इतर संगीत प्रकारांमध्ये प्रगती करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. संगीताचा नियमित रियाज, सादरीकरणातील बारकावे, स्पर्धा व परीक्षांची तयारी, गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व तसेच संगीत क्षेत्रातील विविध करिअर संधी याविषयी विदुषी शुभदा पराडकर विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. संगीत शिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध संगीत परीक्षा देणारे विद्यार्थी, नवोदित गायक-गायिका, संगीत शिक्षक, पालक तसेच संगीतप्रेमी नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून या अनोख्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पॅन, आधार कॅम्प

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि. ५) सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लक्ष्मी मधू सोसायटी, सेक्टर ४, नवीन पनवेल येथे मोफत पॅनकार्ड आणि आधार कार्ड कॅम्पचे आयोजन आरपीआयचे पनवेल महानगरपालिका अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी केले आहे. यावेळी आधार कार्ड अपडेट, मोबाइल नंबर अपडेट, बायोमेट्रिक आदी कामे करण्यात येणार आहेत. नागरिकांनी आवश्यक असणारी कागदपत्रे घेऊन या कॅम्पमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंचशील नगरच्या पुनर्वसनाला गती

### आमदार मंदा म्हात्रेंच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील झोपडपट्टीधारकांना हक्काचे व सन्मानजनक घर मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. सीबीडी बेलापूर येथील पंचशील नगर १ आणि २मधील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर एसआरएअंतर्गत चालणाऱ्या प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली आहे. याच अनुषंगाने मंगळवारी आमदार मंदा म्हात्रे यांनी पंचशील नगर १ आणि २ परिसराला प्रत्यक्ष भेट देऊन पुनर्वसन प्रकल्पाच्या कामाचा सविस्तर पाहणी दौरा केला.



अक्षय तृतीयेच्या दिवशी पार पडलेल्या बैठकीत आमदार मंदा म्हात्रे यांनी स्थानिक रहिवाशांच्या व्यथा ऐकून घेत त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. केवळ आश्वासनांवर न थांबता आमदार मंदा म्हात्रे यांनी शासन व एसआरए प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून प्रकल्पातील अडथळे दूर केले. पाहणी दौऱ्यात त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन कामाचा आढावा घेत नागरिकांशी थेट संवाद साधला.

दौऱ्यादरम्यान तांत्रिक व प्रशासकीय बाबींची तत्काळ दखल घेण्यासाठी भूमापक अजित व श्रीनिवास तसेच नागरी सुविधांशी संबंधित कामांसाठी सहाय्यक अभियंता सुधीर सोनवणे हे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. आमदार मंदा म्हात्रे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना व विकासकांना कामात पूर्ण पारदर्शकता ठेवून दर्जा सांभाळण्याच्या आणि प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्या.

पाहणी दौऱ्यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत भाजप नेते निलेश म्हात्रे, ज्योती पाटील, प्रमोद जोशी, अ‍ॅड. संतोष पळसकर, अमित गाडे यांसह स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘सीकेटी’त रानभाज्या प्रदर्शनातून जैवविविधता संवर्धनाचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये रानभाज्यांचे पौष्टिक, औषधी व पर्यावरणीय महत्त्व तसेच जैवविविधतेच्या संवर्धनाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने रानभाजी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन विज्ञान शाखेचे प्रमुख डॉ. बी. डी. आघाव यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे पर्यावरणपूरक कोकेडामा या हरित भेटवस्तूने स्वागत करण्यात आले. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. आशा भगत यांनी स्वागत करून रानभाज्यांचे पोषणमूल्य, औषधी उपयोग, स्थानिक पारंपरिक ज्ञानाचे जतन आणि जैवविविधतेच्या संवर्धनाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले.

प्रदर्शनात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत २७ विविध रानभाज्यांचे संकलन व आकर्षक प्रदर्शन सादर केले. प्रत्येक रानभाजीसोबत तिचे स्थानिक व शास्त्रीय नाव, कुल, पोषणमूल्य, औषधी उपयोग आणि पारंपरिक आहारातील महत्त्वाची माहिती प्रदर्शित करण्यात आली. प्रदर्शनाला विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध विभागांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी डॉ. बी. डी. आघाव यांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाचे कौतुक करत रानभाज्या या आपल्या पारंपरिक आहाराचा अमूल्य वारसा असून त्यांचे संवर्धन आणि प्रसार ही काळाची गरज असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि स्थानिक जैवविविधतेबद्दल आदर निर्माण होतो, असे नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना रानभाज्यांची ओळख, त्यांचे पोषणमूल्य, औषधी गुणधर्म व संवर्धनाचे महत्त्व अनुभवातून समजले. आरोग्यदायी आहार आणि जैवविविधतेच्या संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी वनस्पतिशास्त्र विभागाच्या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या अभिनव सादरीकरणाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. भविष्यातही अशा शैक्षणिक, संशोधनाभिमुख व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले.

# टी.एन. घरत विद्यालयात अभिमुखता कार्यक्रम उत्साहात

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन. घरत कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी शनिवारी (दि. १) अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती वंदना आणि स्वागतगीताने झाली. शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर यांनी विद्यार्थी व पालकांचे स्वागत करून इयत्ता अकरावीचे शैक्षणिक महत्त्व, मंडळ परीक्षेची तयारी, करिअर नियोजन, शिस्त, वेळेचे व्यवस्थापन आणि ध्येय निश्चिती याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी राज्य मंडळाचे शाळा निरीक्षक संतोष चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करताना संस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधा व सहकार्याची माहिती दिली.

अकरावीच्या वर्गशिक्षिका कोमल पाटील यांनी उपस्थितीचे नियम, गणवेश, प्रयोगशाळा, क्रीडा व सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. समारोप दीपाली कोल्हे यांनी आभार प्रदर्शनाने केला. विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांच्या शंका दूर होऊन त्यांनी आत्मविश्वासाने महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात करण्याची प्रेरणा घेतली.

# डी.डी. विसपुते कॉलेजमध्ये नशामुक्तीचा जागर

### विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस विभागाच्या वतीने रविवारी (दि. २) "नशामुक्त युवा विकसित भारत २.०" या जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानात ५००हून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

अभियानांतर्गत व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ, जनजागृती रॅली, पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा, पथनाट्य, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रश्नमंजुषा तसेच विद्यार्थी जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी से टू नो ड्रग्ज, से येस टू लाईफ हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार केला आणि व्यसनमुक्त भारत, निरोगी भारत व विकसित भारत घडविण्यासाठी सक्रिय सहभागाची शपथ घेतली.

उपक्रम प्राचार्य डॉ. आशिष जैन तसेच आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष धनराज विसपुते व सचिव संगीता विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

# गव्हाण येथील विद्यालयात महापुरुषांना अभिवादन!

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम शनिवारी (दि.१) उत्साहात संपन्न झाला.



इयत्ता दहावी 'ड' वर्गाच्या वतीने वर्गशिक्षिका चारुशीला ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. यावेळी अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन करून उपस्थितांनी त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्याचा आदर्श अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समिती सदस्या तथा विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, क्रीडाशिक्षक सुरेश पारखे, गुरुकुल विभागप्रमुख संदीप भोईर तसेच सर्व शिक्षक व रयतसेवक उपस्थित होते.

यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या कार्यावर प्रभावी मनोगते व्यक्त केली. तसेच इयत्ता पाचवी 'ब'मधील यश लक्ष्मण खरात, सौरभ संदीप मनवर, अबुजर शाहीद कुरेशी, संजना संतोष चौरे, स्वरा चंद्रकांत सुतार, जय रमेश वर्तक, श्लोक किरण पाटील तसेच इयत्ता सातवी 'ब'मधील बाशीर शाहीद कुरेशी यांनी ओजस्वी भाषणांद्वारे उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हर्षला पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला प्रेरणादायी व राष्ट्रभक्तीपूर्ण वातावरण लाभले.


संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा,
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे
ह्याच वाढदिवसाच्या शुभेच्छा..!
5 ऑगस्ट
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष
आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !
TIPL
शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015, ISO 14001-2015 & ISO 45001-2018 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
• Tel. : 022 27452713, 9769409120
• Email : thakurinfraprojects@gmail.com
• Web : www.thakurinfraprojects.in


आमदार
मा. श्री.
विकासाची दृष्टी ठेवून, रचनात्मक काम करणारा उत्तम संघटक...
प्रशांतदादा ठाकूर आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. मयुर परशुराम शेलार
सदस्य -पनवेल पंचायत समिती
अध्यक्ष -युवा मोर्चा पनवेल तालुका दक्षिण
मा. सरपंच - गु.ग्रा. पंचायत आपटा


भाजपा
सरचिटणीस, कळंबोली मंडळ भाजपा
श्री. दिलीप बिश्त
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
सौजन्य : अमर अरुण पाटील, (अध्यक्ष, कळंबोली मंडळ)


भाजपा
भाजपा युवा कार्यकर्ते
ॲड. इर्शाद शेख
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
सौजन्य : मनसुर पटेल


नोकरीची सुवर्ण संधी!
भारतीय जनता पार्टी, पनवेल
आयोजित
CAREER
महारोजगार मेळावा
2026
रोजगार शोधणाऱ्यांना सुवर्णसंधी!
नामांकित कंपन्या व उद्योगांमध्ये उत्तम नोकरी संधी मिळवण्यासाठीमहारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.
दि. 8 ऑगस्ट 2026 | वेळ: सकाळी ९:०० वा.
स्थळ: चांगु काना ठाकूर महाविद्यालय, खांदा कॉलनी, पनवेल
दहावी उत्तीर्ण, बारावी उत्तीर्ण, ITI, डिप्लोमा धारक, पदवीधर, पदव्युत्तर किंवा अकुशल उमेदवार - सर्वांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध!
आजच नोंदणी करा!
पोस्टरवरील QR कोड स्कॅन करा किंवा Google Form लिंकवर क्लिक करा
https://forms.gle/nDnwenwTfK64msMCA
▶ नामांकित कंपन्यांचा सहभाग
▶ जागेवर नोकरी संधी मिळवण्याची संधी
▶ उत्तम नेटवर्किंगची सुवर्णसंधी
:अधिक माहितीसाठी संपर्क :
7498074105
यासाठी कोणतीही सहभागी किंवा नोंदणी फी नाही.
आपले भविष्य आपणच घडवूया!
प्रशांत ठाकूर
आमदार - पनवेल विधानसभा